# प्रकरण दुसरे

## दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे

# प्रकरण दुसरे

# दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे


प्रास्ताविक

१. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा परिचय

२. अस्तित्ववादी विचारप्रणाली

३. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे

३.१ 'ऑर्फियस' कथासंग्रहाची आशयसूत्रे

३.१.१ अस्तित्ववादी जाणिवा प्रकट करणाऱ्या कथा

३.१.२ महानगरीय कथा

३.१.३ स्त्री-पुरुष मिलनातून अस्तित्व जाणीवा प्रकट करणाऱ्या कथा

३.१.४ जीवनाचा उत्कट शोध घेणाऱ्या कथा

४. 'चतुरंग' मधील आशयसूत्रे

४.१ अतिवास्तववादी विचारप्रणाली

४.२ जादूमय यंत्रात्मकतेचा आविष्कार - 'सॅफायर'

४.३ 'स्व' चा अस्तित्वशोध - रुधिराक्ष

४.४ 'स्त्री' च्या अंतर्मनाचा वेध - 'द फुल मून इन विंटर'

४.५ एब्राहामच्या अस्तित्वाचा शोध - 'एब्राहामची वही'

सारांश


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण : दुसरे

# दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे

## प्रास्ताविक :

पहिल्या प्रकरणामध्ये १९६० नंतरच्या कथा व लघु-कादंबरीचे स्वरूप आणि वाटचाल आपण पाहिली. दुसऱ्या प्रकरणामध्ये आपल्याला दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील आशयसूत्रांचा शोध घ्यावयाचा आहे.

दिलीप चित्रे यांच्या सबंध साहित्यलेखनावर अस्तित्ववादी विचारप्रणालीचा प्रभाव आहे. तसेच त्यांचे कथात्म लेखन हे आत्यंतिक व्यक्तिकेंद्री असल्याचे दिसून येते. चित्रे अस्तित्ववादी दृष्टिकोणाद्वारे माणसाच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे कथात्म साहित्य एक वेगळेच परिणाम गाठते. प्रस्तुत प्रकरणामध्ये दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील आशयसूत्रांचा विचार करावयाचा आहे. त्यापूर्वी त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा संक्षेपाने विचार करूयात.

## १. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा परिचय :

कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या जडघडणीत त्याच्या बालपणीचा महत्त्वाचा ठरतो. दिलीप चित्रे यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा संस्थानात झाली. त्यांचा जन्म बडोदा येथे १७ सप्टेंबर १९३८ रोजी झाला. चित्रे यांच्या व्यक्तिमत्व जडणघडणीत बडोदा, मुंबई या शहरांचा तेथील संस्कारांचा खूप मोठा वाटा आहे. चित्रे यांनी वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षी रोझरी हायस्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला. दुसऱ्या इयत्तेपासून त्यांचे शिक्षण रावपुरा अप्पर प्रायमरी स्कूल या म्युनिसिपल या मराठी माध्यमाच्या शाळेत झाले.

चित्रे यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत त्यांच्या कुटुंबाचे महत्वाचे स्थान आहे. चित्रे यांचे वडील पुरुषोत्तम आत्माराम चित्रे हे बडोदा येथून 'अभिरूची' हे मराठी

वाङ्मयीन मासिक चालवित असत. 'अभिरूची' या मासिकाला मराठी साहित्यात महत्वाचे स्थान आहे. त्यावेळी या मासिकातून अनेक लेखक, समीक्षक लेखन करीत होते. त्यामुळे त्यांच्या घरी अनेक लेखक-समीक्षकांची वर्दळ होती. अनेक साहित्यविषयक चर्चा त्यांच्या घरी होत. या सर्व पर्यावरणाचा परिणाम, प्रभाव म्हणून दिलीप चित्रे यांना लहानपणापासूनच वाचनांची आवड निर्माण झाली. अशा पद्धतीने त्यांच्यावर वाङ्मयीन संस्काराची सुरवात झाली. "अगदी लहानपणापासून भाषेच्या अरण्याविषयी गेलं घराजवळच्या राम मंदिरातली कीर्तनं, घरामागच्या वस्तीतील भजनं, आज्या-पणज्या कडून ऐकलेल्या ओव्या आणि गोष्टी, नाटक, भाषणं यातून माझ्या भाषेचा कान तयार झाला. आई-वडील वाङ्मयप्रेमी, वाङ्मयीन नियतकालिकाचे आणि पुस्तकाचे प्रकाशक, घरात भरपूर पुस्तकं आणि लेखकांची ये-जा यामुळे लहानपासूनच वाचनाची आवड होती."[१] चित्रे यांच्यावर एकाचवेळी मौखिक परंपरेतील व ग्रांथिक स्वरूपाचे संस्कार होत होते. कीर्तने, भजने, गोष्टी, नाटक, ओव्या, भाषणे ऐकण्यामधून त्यांचा भाषा ग्रहण करण्याचा व भाषेला प्रतिसाद देण्याचा कान वडोदा नगरीत तयार झाला.

दिलीप चित्रे पुढील शिक्षणासाठी (आठवीच्या वर्गासाठी) मुंबईतील पिंटोव्हिल व धर्मप्रकाश श्री निवसच्या या हायस्कूल मध्ये दाखल झाले. पदवीपर्यंतचे शिक्षण रूईया महाविद्यालयात घेऊन पुढे याच महाविद्यालयामध्ये फेलो म्हणून अध्यापनाचे काम पूर्ण केले. दिलीप चित्रे यांच्या जीवनाचा बराच काळ मुंबईत व्यतीत झाला. या शहराचे वैशिष्ट्यपूर्ण संस्कार त्यांच्यावर झाले आहेत. चित्रे यांनी मुंबई महानगराचे संस्कार व अनुभव पुढे आयुष्यभर कसे उपयोगी पडले ते एका निबंधात तपशिलाने सांगितले आहे. ते लिहितात, "मी बाराव्या वर्षी प्रथम बडोद्याहून मुंबईला आलो. त्यानंतर मुंबईतच वाढलो. हे माझं आवडतं शहर. याचा कानाकोपरा मी हिंडलोय. ज्या वस्त्यांमध्ये मध्यमवर्गीय महाराष्ट्रातील मुलं कधीच फिरली नसतील अशाही वस्त्यात शहरांची भौगोलिक आणि सामाजिक माहिती मला दारूच्या आणि चरसाच्या अड्ड्यात झाली, तशीच नातेवाईक आणि मित्रांमधल्या कामगार कार्यकार्त्यांबरोबर इकडेतिकडे फिरून आपोआप. त्यातून माझे मित्र समाजातल्या नाना

थरातले. कोणी पारशी, कोणी मुस्लिक, कोणी गोव्याचे किंवा ईस्ट इंडियन कॅथलिक शाळेत माझ्या वर्गातील अर्धी मुलं धारावीची दलित जमातीतील कॉलेजात इंग्रजी विषयामुळे कोणी तामीळ, कोणी बंगाली, कोणी मल्याळी, कोणी पंजाबी. वाट्टेल ते खाण्यापिण्याचा नुसता सराव नव्हे तर आवडच. शहरातला हा सांस्कृतिक अक्करमाशेपणा मला पुढे जन्मभर उपयोगी पडला. माणसाच्या संबंधातूनसुद्धा लहानपणाचं आणि वयात आल्यानंतरचं भांडवल असंच उपयोगी पडलं."[२] चित्रे म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्यावर मुंबई शहरातील सांस्कृतीक अक्करमाशेपणाचे संस्कार मोठ्या प्रमाणात झाले आहेत. चित्रे या शहरातील कोणताही अनुभव समरसून घेतात. बालपणी झालेल्या वाङ्मयीन तसेच मुंबई महानगरातील बहुविध अनुभवातून दिलीप चित्रे यांच्या एकूणच व्यक्तीमत्वाची जडणघडण झाली आहे.

अनियतकालिकाच्या चळवळीतही चित्रे अग्रेसर होते. १९५४ साली निघालेल्या 'शब्द' या अनियतकालिकाच्या संपादनात अरूण कोलटकर, बंडू वझे, रमेश समर्थ यांच्यासमवेत चित्रे यांचा पुढाकार होता. १९५९-६0 च्या दरम्यान चित्रे यांनी 'चित्रा' या दैनिकात उपसंपादक म्हणून काम पाहिले. १९६0 साली चित्रे इथिओपियात इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून गेले. तिथे त्यांचे तीन वर्षे वास्तव्य होते. १९७५ ते ७७ या कालावधीत चित्रे यांनी भारतीय लेकखांच्या आंतरराष्ट्रीय लेखन कार्यक्रमात सहभाग घेतला होता. या साऱ्या संस्कारातून, अनुभवातून चित्रे यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली आहे. चित्रे आधुनिक मानवी संस्कृतीकडे व कलेकडे एका विशिष्ट्य प्रगल्भ दृष्टीने पाहतात. पाश्चिमात्य आधुनिक साहित्याचा, विचारसरणींचा प्रभाव त्यांच्या समग्र लेखनावर आहे. अशा या बहुआयामी व्यक्तीमत्व असणाऱ्या साहित्यिक विचारवंताचा मृत्यू १0 डिसेंबर २00९ रोजी झाला.

## २. अस्तित्ववादी विचारप्रणाली :

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याचा आढावा घेण्यापूर्वी त्यांच्या समग्र लेखनावर प्रभाव असणाऱ्या अस्तित्ववादी विचारप्रणालीचा थोडक्यात परामर्श करून घेणे महत्त्वाचे ठरते.

अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा पाया युरोपमध्ये प्रथम रोवला गेला. अस्तित्ववादी

विचारप्रणालीचा प्रथम परिचय १९ व्या शतकाच्या पूर्वाधात सोरेन कीर्केगार्ड (१८१९-१८५५) या डॅनिश विचारवंताच्या लेखनातून होतो. यानंतरच्या काळात फ्रेडनिख् नीत्शे, कार्ल यास्पर्स, ग्रेबिएल मार्सेल, मार्टिन हायडेगर, अल्बेर काम्यू आणि जाँ पॉल सार्त्र यांच्या विचार-लेखनातून अस्तित्ववादाच्या खूणा अभिव्यक्त झालेल्या दिसतात. मराठी साहित्यामध्ये रा.शं.वाळिंबे, दि.के.बेडेकर, रा.ग.जाधव, मे.पु.रेगे, श्री.के.क्षीरसागर, गंगाधर पाटील, वसंत आबाजी डहाके, विश्वास पाटील इत्यादी समीक्षकांनी अस्तित्ववादासंबंधी स्फुट-दीर्घ स्वरूपात चर्चा केली आहे.

'Existentialism' या इंग्रजी शब्दाला मराठीत पर्यायवाचक म्हणून 'अस्तित्ववाद' हा शब्दप्रयोग वापरण्यात येतो. 'Existence' या शब्दाची वेब्स्टरच्या शब्दकोशात पुढील व्युत्पत्ती आढळते.

'Existence' या शब्दात to exist असा धातू आहे. मूळ लॅटिन Existere = Come in to being ह्या शब्दाचे काही प्रमुख अर्थ पुढीलप्रमाणे

१. "to have actul or real being whether material or spiritual have been in space & time..."

२. "to have being in any specified condition or place or with respect to any understood limition .

३. "to have continue to be : maintain being..."

४. "to have life or the function of vitality....."

'अस्तित्व' या शब्दाला अभिप्रेत असणारा अर्थ सांगताना वेब्स्टर पुढे म्हणतो, "to have contingent but free & responsible being; also : to live as one that has such being."[३]

ऑक्सफर्ड शब्दकोशात 'अस्तित्व' या शब्दाचे, " Being existing; life; mode of existing; all that exists; existing thing."[४]

मराठीमध्ये रा.शं वाळिंबे यांनी 'अस्तित्व' या शब्दाची व्युत्पत्ती विस्ताराने सांगितली आहे. ते म्हणतात, "इगझिस्टन्स या शब्दात झगझिस्ट हा धातू आहे. झगझिस्ट या

धातूचे ec आणि Sist असे दोन घटक आहेत. संस्कृतमधील 'स्थापय्' या प्रायोजक धातूसाठी लॅटिनमध्ये Sist किंवा Sister असा धातू वापरतात. मूळ धातू Stare असा असून तो संस्कृत 'स्था' या धातूचा पर्याय आहे. 'इगझिस्टन' म्हणजे असण्याची क्रिया. 'इगझिस्टंट' (= असणारा) हे 'इंग्झिस्टिअर' या लॅटिन धातूचे वर्तमानकालवाचक धातूसाधित नाम आहे. यापासून 'एगझिस्टेन्शनल' हे भाववाचक नाम तयार झाले."[५] अस्तित्ववादातील 'अस्तित्व' या शब्दाबाबत खूप मतांतरे झालेली दिसून येतात. अस्तित्ववादात 'अस्तित्व' हा शब्द मानवी अस्तित्व या अर्थाने येतो. मानवी अस्तित्व एवढ्या मर्यादित अर्थामध्ये अस्तित्व सामावलेले नसून यापेक्षाही व्यापक अर्थ अपेक्षित आहे, याबाबत विश्वास पाटील म्हणतात, "अस्तित्व हा शब्द मानवी व्यक्तीला त्यातल्या त्यात आत्मोद्धाराच्या कल्पनेने ज्याला पछाडलेले आहे, अशा व्यक्तीला लावला जातो. यामुळे मुळात अस्तित्व म्हणजे 'त्या जिथे जगात असणे' हा जो अर्थ होतो त्याऐवजी अस्तित्व म्हणजे काही अंशी सार्वत्रिकपणे आढळून येणारा मानवी विशेष (त्या तिथे जगात' असण्याची मानवाची विशिष्ट पद्धती) व काही अंशी सन्मानदर्शक चिन्ह म्हणून हा शब्द या तत्वचिंतनात वापरण्यात येतो."[६] त्याचे उपरोक्त विधान समर्पक वाटते. एकूणच माणसाच्या असण्याची व आत्मोद्धोराची स्थिती अस्तित्ववादाला अपेक्षित आहे.

अस्तित्ववादी तत्त्वज्ञानांच्या मते केवळ जन्माला आलेला जीव म्हणजे अस्तित्व नव्हे. ते नुसते असतेपण म्हणावे लागेल. आपले जे 'असतेपण' आहे ते त्याने आत्माविष्कारातून प्रस्थापित करायचे, ठसवायचे आहे. आपल्या विचारातून व कृतीतून शुद्ध असतेपणाला' एक निश्चित अर्थ प्रदान करायचा आहे. म्हणून 'अस्तित्व' या शब्दाआधी 'स्वतंत्र' हे विशेषण एरवीही अनेकदा सहजपणे लावले जाते. व्यक्तीच्या फक्त तेथे असण्याला, अनेकांतल्या एक बनून राहण्याला अस्तित्ववाद्यांच्या लेखी काही किंमत नाही, तर मे.पु रेगे म्हणतात त्याचप्रमाणे, "मानवी परिस्थिती आणि जीवन यांच्याकडे पाहण्याची एक विवक्षित दृष्टी आणि अनुरूप अशी जगण्याची शैली अस्तित्ववादाशी निगडीत आहे."[७] ज्यांच्या नैसर्गिक, मानसिक, शारीरिक व बौद्धिक प्रेरणांचा काहीही अविष्कार होत नाही, ज्यांचे मन निर्विकार व कोरे करकरीत आहे. अशा फक्त येथे असणाऱ्यांचा विचार ते करीत

नाहीत. आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाण असलेल्या, आपल्या ठिकाणी असलेली स्वाभाविक शक्ती ओळखून क्षमता वापरणाऱ्या व स्वत:ला घडवत जाणाऱ्या व्यक्तीलाच प्रश्न पडतात, आत्मशोध घेण्याची निकड जाणवते. मनाने थिजलेल्या माणसाचे अस्तित्व मानायचे कशासाठी ? ते असो वा नसो, त्यामुळे काय फरक पडतो ? येथे व्यक्तींच्या साक्षात अस्तित्वाशी गाठ होती, जगण्याचा अन्वयार्थ समजावून घ्यावयाचा होता. अस्तित्ववादी तत्त्वज्ञ प्रत्यक्ष जीवनाला कसे भिडले होते, आत्मशोध घेण्यास किती उत्सुक होते. याची साक्ष त्यांच्या लेखनातून मिळते. त्यांच्या अनुभवातून व जगण्यातून विचारांना आकार येत गेला. त्यामधून या विचारांना प्रभावी तत्त्वज्ञानाची पातळी लाभली. त्यामुळे पढिक पांडित्य असे त्यांचे स्वरूप नसून प्रत्येक अस्तित्ववादी विचारवंत हा कमालीचा आत्मनिष्ठ आहे, तो त्याच्या स्वानुभवाच्या आधारे तत्त्वज्ञानाची मांडणी करतो. त्यामुळे या सर्व विचारवंताच्या विचारांची सुतार्किक व एकसंध व्यवस्था लावणे अत्यंत जिकीरीचे होते. अस्तित्ववाद्यांना अशी व्यवस्था कृत्रिम वाटते. त्यांचे लेखन तत्त्वज्ञानाच्या रूढ पद्धतीस अनुसरत नाही. त्यामुळे अस्तित्ववादाची काटेकोर व्याख्या करणे किंवा कोणती तरी एक व्याख्या प्रमाण मानणे कठीण होते.

अशाप्रकारे पाश्चिमात्य तसेच मराठी साहित्यामध्ये अस्तित्ववादासंबंधी स्वरूपात चर्चा झाली आहे. माणसाच्या एकूणच जगण्याविषयीचे तत्त्वज्ञान अस्तित्ववादात सामावलेले दिसून येते.

## ३. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे :

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे अभ्यासताना त्यांच्या कथात्म साहित्यकृतींचा आशय समजून घेणे महत्त्वाचे ठरते. 'ऑर्फियस' मधील कथा तसेच 'चतुरंग' मधील लघुकादंबऱ्यातील आशयाच्या संदर्भात त्यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे अभ्यासने महत्त्वाचे आहे.

## ३.१ 'ऑर्फियस' कथासंग्रहाची आशयसूत्रे :

१९६८ साली दिलीप चित्रे यांचा 'ऑर्फियस' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यापूर्वी या कथासंग्रहातील कथा प्रामुख्याने 'सत्यकथा' या मासिकातून प्रसिद्ध झाल्या.

सत्यकथेमधून जेव्हा चित्रे यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या तेव्हा वाचक आणि समीक्षकांनी वादग्रस्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. त्यात प्रामुख्याने प्र.के.अत्रे, दि.के.बेडेकर यांचा समावेश आहे. 'ऑर्फियस' या कथासंग्रहामध्ये एकूण बारा कथा व चित्रे यांचा 'स्वतःच्या लेखनासंबंधीचे विचार' हा लेख समाविष्ट आहे. हा लेख मराठीतला साहित्य निर्मिती प्रक्रियेचे रहस्य उलगडणारा एक महत्त्वाचा लेख आहे. 'ऑर्फियस' मधील सर्वच्या सर्व बारा कथा ह्या एका वेगळ्याच विचार-जाणिवा प्रकट करणाऱ्या आहेत. आधुनिक प्रयोगशिलतेचा प्रत्यय 'ऑर्फियस' मधील कथा वाचताना क्षणोक्षणी येतो. चित्रे यांची कथा वाचून वाचकांच्या प्रचलित, पारंपरिक कथाकल्पनांना तडा जातो. त्यांची प्रत्येक कथा ही नित्यनवीन वाटते. याबाबत भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे, "नव्या दिशेने प्रवास करणाऱ्या कथेत स्तिमित करणारा, धक्का देणारा असा काहीतरी भाग असतोच आणि त्यामुळे आपल्या पूर्वापार कल्पनांची संघटनाच बदलून जाते. अशा वेळी आपल्या कथाविषयक कल्पनांचीच कक्षा वाढविणे आवश्यक ठरते."[८] चित्रे यांची कथा वाचकांना स्मिमित करते. म्हणून चित्रे यांची कथा जाणून घ्यायची असेल तर पारंपरिक कथातंत्राचे आपल्या मनावर असलेले जोखड दूर करणे महत्त्वाचे ठरते. 'ऑर्फियस' मधील बारा कथांतून दिलीप चित्रे यांनी माणसाच्या अस्तित्वाची शोकांतिका मांडली आहे, आणि ही शोकांतिका मांडताना त्यांनी अस्तित्ववादी व अतिवास्तववादी विचारप्रणालींचा आधार घेतला आहे. अफाट अशा पसरलेल्या महानगरातून एकाकीपणे जीवन जगणाऱ्या माणसाचे चित्रण त्यांच्या कथातून पहावयास मिळते. चित्रे म्हणतात त्याप्रमाणे, "या लेखनापैकी माझ्या दृष्टीने खास महत्त्व गोष्टीपुरते, 'केसाळ काळंभोर पिल्लू', 'तिरडी, तिडीक आणि अनंतकाळ', 'ऑर्फियस', 'अंधारातला अप्रेंटिस' आणि 'टाइपरायटर' या गोष्टींना आहे."[९] अस्तित्ववादी जाणिवांचा उत्कट आविष्कार उपरोक्त कथांमधून होतो, म्हणून चित्रें यांच्या दृष्टीने या कथा विशेष उल्लेखनीय आहेत पण 'ऑर्फियस' मधील सर्वच्या सर्व बारा कथा ह्या चित्रे यांच्या विविधप्रतिक्रियाक्षम मनोवृत्तीच्या द्योतक आहेत. विविध आशयसूत्रांनी परिपूर्ण असणारी चित्रे यांची कथा मराठी कथेच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानता येईल. त्यांच्या कथात्म साहित्याच्या आशयसूत्रांचा आढावा

विस्ताराने घेणे महत्त्वाचे ठरते. प्रथमत: 'आर्फियस' कथासंग्रहाच्या आशयसूत्रांचा आढावा घेऊ.

### ३.१.१ अस्तित्ववादी जाणिवा प्रकट करणाऱ्या कथा :

अस्तित्ववादी विचार-जाणिवा प्रकट करणे हे दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे प्रधान वैशिष्ट्य होय. युरोपीय साहित्याचा प्रभाव त्यांच्या लेखनावर आहे. आधुनिक काळात मानवी अस्तित्वाला खुप महत्त्व प्राप्त झाले आहे. 'असण्याची' जाणीव अस्तित्वाच्या मूळाशी असते. ह्या अस्तित्ववादी विचारप्रणालीचा आढावा प्रकरणाच्या सुरवातीलाच घेतला आहे. त्यांच्या बहुतेक कथा अस्तित्ववादी जाणिवा प्रकट करणाऱ्या आहेत. त्यांच्या कथा नव्या जाणिवेच्या, नव्या विचारसरणीच्या आहे. त्या निटपणे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. पारंपरिक कथासाच्याला छेद देऊन चित्रे यांनी मराठी कथेमध्ये नवता आणली. पण ही नवता समीक्षकांनी नीटशी समजून न घेतल्यामुळे गोंधळ निर्माण झाला आहे. 'ऑर्फियस' कथासंग्रहातील सर्वच कथांवर अस्तित्ववादी विचारप्रणालीचा प्रभाव आहे. हा प्रभाव 'ऑर्फियस', 'मेथिड्रिन', 'केसाळ काळंभोर पिल्लू', 'व्हायरस', 'तिडीक', 'तिरडी आणि अनंतकाळ' व 'स्कार्पिओ' या कथांवर अधिक प्रकर्षाने जाणवतो. त्यांच्या कथांतील अस्तित्ववादी जाणिवेचे स्वरूप पाहुयात.

'ऑर्फियस' ही या कथासंग्रहातील पहिलीच कथा आहे. या कथेतील नायकाला एका स्मशानभूमीमध्ये आपल्याच जन्मदिनी जन्मलेल्या ॲना आव्हाकियान या तरुणीचे थडगे दिसते. जन्मदिनाच्या योगायोगाने नायकाची अवस्था गोंधळलेली होते. आपल्याच जन्मदिनी जन्मलेल्या आणि वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी मृत्यू पावलेल्या ॲनाबद्दल नायकाच्या मनामध्ये कुतूहल निर्माण होते आणि या कुतूहलापोटीच नायक ॲनाच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. ॲना दिसायला कशी होती. या संभ्रमात नायक पडतो. "हजारो वाहू, हजारो उघड्या पाठी, हजारो थरथरणारी वक्षस्थळ, हजारो विवस्त्र, अनावृत्त, जिवंत शरीरं, अंगी मुसमुसलेला शांत, प्रगल्भ किंवा नाचरा, उसळता किंवा हुरूपहीन, सर्द -जिवंतपणा.काहीवर देवीचे वण होते, काहीचे नाकडोळे कमी अधिक उठावदार."[१०]

अशाप्रकारच्या रूपातून नायक ॲनाचे अस्तित्व शोधण्याचे प्रयत्न करतो. ॲनाचा मृत्यू कशामुळे झाला याबाबतही नायकापुढे प्रश्नचिन्हच आहे. मध्यरात्री एका स्वप्नसदृश्य दृश्यात नायकाला ॲनाचे दर्शन होते, आणि इथे कथा संपते. अवघ्या पाच पृष्ठाच्या या कथेत नायकाची अस्तित्वशोधाची धडपड चित्रे यांनी प्रभावीपणे रेखाटली आहे. मुळात 'ऑर्फियस' हे ग्रीक पुराणातील एक मिथक आहे. आपल्या प्रेयसीला पाताळातून ऑर्फियस आणतो. त्यावेळी मागे वळून पाहिले नाही तरच त्याच्या मागून येण्याची ती अट घालते. ग्रीक पुराणातील ऑर्फियस या मिथकाची पार्श्वभूमी लाभल्यामुळे या कथेला एक वेगळेच परिणाम लाभले आहे.

अस्तित्ववादी जाणिवा प्रकट करणारी 'मेथिड्रिन' ही एक महत्त्वाची कथा आहे. ह्या कथेचा नायक प्रिस्क्रिप्शन शिवाय केमिस्टच्या दुकानातून 'मेथिड्रिन' नावाचे उत्तेजक औषध मिळवतो. मेथिड्रिनची नशा वाढल्यानंतर, आणखी मेथिड्रिन घेतल्यानंतर त्याच्या मनावरील दडपणाचे ओझे कमी झाले होते, आणि त्याला मोकळे वाटू लागते. कुणापुढेतरी आपण आपले मन मोकळे करावे असे त्याला वाटू लागते. त्याला इतके मोकळे वाटू लागते की, "ह्या क्षणी माझ्या हातात पेन असतं तर जगातलं सर्वोत्कृष्ट महाकाव्य मी वरळीपासून थेट बांद्र्यापावेतो फाळलं असतं."[११] अशी त्याची मोकळेपणाची अवस्था होते. मेथिड्रिन घेतल्यामुळे नायकाच्या मनावरील संकेताचे ओझे कमी होते. समाजामध्ये वावरत असताना प्रत्येक व्यक्तीला सामाजिक नियमांमध्ये बंदिस्त राहून जीवन जगावे लागते. त्यामूळे व्यक्तिच्या जीवनाला कोंडलेपण, साचलेपण प्राप्त होते. एकप्रकारे तो अस्तित्वहीन जीवन जगत असतो. उत्कटपणे जगण्याची ईच्छा असूनही तो सामाजिक संकेतात बंदिस्त होऊन जीवन जगतो. मात्र मेथिड्रिन या कथेतील नायक हे संकताचे ओझे फेकून उत्कटपणे जगू इच्छितो त्याचे प्रकटीकरण मेथिड्रिन या कथेमध्ये यांनी केले आहे. मनावरील संकेताचे ओझे कमी झाल्यावर तो आपल्या जुन्या मैत्रिणीकडे जातो. मैत्रिणीबरोबर गतकाळात जगायचे राहून गेले होते ते जगणे नायक तिच्यासोबत उत्कटपणे जगू इच्छितो. नायक तिला उत्कटपणे जवळ घेतो, अशावेळी ती नायकाला प्रतिसादही देत नाही व प्रतिकारही करीत नाही. नायक तिच्याशी

मनमोकळे पणाने वागतो. एक प्रकारच्या समाधानाची अवस्था नायकाला प्राप्त झालेली असते. चित्रे उत्कटतेला अस्तित्वाची अंतिम कसोटी मानतात. म्हणून या कथेतील नायक मनावरील सामाजिक संकेताचे ओझे दूर लोटून उत्कटपणे जगू इच्छितो. उत्कटपणे जगू इच्छिणाऱ्या नायकाची धडपड या कथेतून व्यक्त झाली आहे.

'व्हायरस' या कथेतून चित्रे यांनी एका डॉक्टरांच्या अस्तित्वविषयक मानसिकतेचा तसेच लैगिंकतेबद्दल तरूणामध्ये वाढत जाणाऱ्या बैचेनीवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे. डॉक्टरांच्या मित्राचा कॉरोनरी फेल्युअर होऊन मृत्यू होतो तेव्हा त्यांना एकाएकी आपलं आयुष्य अर्थशून्य असल्याची जाणीव होते. एका अर्थी ही डॉक्टरांना आलेली अस्तित्वाची प्रभावी जाणीव होय. "चित्रकार चित्रं का काढतात? कविता लिहायला कवी कसे धजतात? धर्मश्रद्धा कुठून उत्पन्न होते? सामाजिक कार्यकर्त्यांना असा माणूसकीचा काय साक्षात्कार झालेला असतो? मुलांचा जन्म झाल्यावर आई-वडिलांना कोणती अमोघ भावना चाटून जाते? लढाया कशासाठी होतात? क्रांती का होते? खून का होतात? आत्महत्या का केल्या जातात? समाधी का घेतली जाते? काही लोक उगाचच का खचून जातात आणि काही उद्दाम आवेशात कशासाठी मरून जातात."[१२] या प्रश्नांची उत्तरे डॉक्टरांना न मिळाल्यामुळे 'अस्तित्व' म्हणजे नेमके काय? या प्रश्नांनी डॉक्टर गोंधळलेले आहेत. या अस्तित्वविषयक प्रश्नांचा उलगडा होत नाही. या साऱ्या पर्यावरणात 'स्व' साठी धडपडणाऱ्या घटितांचा मानवी अस्तित्वाशी नेमका संदर्भ काय हा प्रश्न मानवी अस्तित्वाला ग्रासून राहतो.

दुसरीकडे रवींद्र नाशिककर हा लग्नाचे वय निघून गेलेला पांढरपेशी तरूण लग्नापूर्वीच्या उदासिनतेने ग्रासलेला आहे. डॉक्टर त्याच्यावर उपचार करून त्याचा आत्मविश्वास वाढवतात. नंतर डॉक्टरांना अशी जाणीव होते की, "मी त्याच्या (नाशिककरच्या) केसमध्ये गुंतत चाललोय. मी संगळ्यांच्या शरीरात, मनात, आत्म्यांत आता गुंतत चाललोय."[१३] अशाप्रकारे आधुनिक व्यक्तिकेंद्री अस्तित्ववादी जाणीव आणि पारंपरिक मानसिकता यांच्यातील ताणाचे चित्रण या कथेत चित्रे यांनी प्रभावीपणे रेखाटले आहे.

दिलीप चित्रे यांची सर्वाधिक चर्चाविषय ठरलेली तसेच समीक्षकांच्या परस्परविरोधी टिकेचा विषय झालेली कथा म्हणजे 'केसाळ काळंभोर पिल्लू' होय. चित्रे म्हणतात त्याप्रमाणे, "ही कथा मी एका रात्री, एका बैठकीत लिहून काढली. लिहिताना मी कोठे अडखळलो नाही. मात्र अनेक वर्षाचे अनुभव आणि निरीक्षणे तिच्यात आढळून आली होती."[१४] वयाची तिशी उलटून गेलेला, हस्तमैथून व स्वप्नसंभोग करणारा, एकाकी राहणारा, जगण्यात अर्थ नसलेला पण तरीही जगण्यासाठी अस्वस्थ असणाऱ्या विठ्ठल महादेव जामखेडकरची अस्तित्व शोधासाठी चाललेली धडपड चित्रे या कथेत मांडतात. चित्रे म्हणताता त्याप्रमाणे या कथेची सुरूवात 'लॉस ऑफ आयडेन्टिटि' ने झाली आहे. स्वत:चे अस्तित्वच हरवून गेलेला हा नायक स्वत:साठी विठ्ठल महादेव जामखेडकर असे नाव स्वीकारतो. या कथेचा नायक हा अगदीच सामान्य असा माणूस आहे. स्वत:च्या अस्तित्व शोधासाठी तो धडपडताना दिसतो, पण तरीही त्याला त्याच्या अस्तित्वाचे आकलन होत नाही. अस्तित्वाचा अर्थ त्याच्या आजीला कळाला होता. आजी आंधळी होती पण ती भरतकाम सुंदर करायची. तिची भरतकामाची सुई डोळस होती. मरताना आजीने नायकाला आपल्या खरखरीत हाताने चाचपले. एका अर्थाने नायकाच्या अस्तित्वाला जाणून घ्यायचा तिचा प्रयत्न होता. आजीच्या या कृतीने नायक घाबरतो. आजीला आपल्या मरणाची जाणिव होती. पण नायकाचे आजोबा नेणीवेत मेले. नायक मृत्यूच्या भयाने अस्वस्थ होतो. या जाणिवेनंतर नायक म्हणतो, "नंतर मला भयंकर भूक लागली – इतकी भूक मला अनेक वर्षात लागली नव्हती. मी एका हॉटेलात जाऊन चिक्कार जेवलो. पण नंतर मला तडस लागली."[१५] अस्तित्वाची प्रभावी जाणीव आलेला नायक उत्कटपणे जगू इच्छितो. भूक लागण्याची प्रक्रिया ही नायकाच्या असतेपणाशी झगडण्याची प्रक्रिया म्हणावी लागेल.

एकाकीपणे जीवन जगणाऱ्या विठ्ठल जामखेडकरचा एका ऑफिसमध्ये वरिष्ठ अधिकारी असणाऱ्या राणेबाईंशी संबंध येतो. राणेबाईसमवेत घडून आलेल्या शरीरसंबंधातून नायकाला आपल्या अस्तित्वाची एक वेगळीच जाणीव येते. मिसेस राणे या विवाहित असतात. एका प्रतिष्ठित समाजात त्यांचे वावरणे असते. चांगली नोकरी, गाडी, बंगला,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संपत्ती इत्यादी सुखसोयी त्यांच्याकडे आहेत. एवढे सारे असूनही राणेबाई एकाकी आहेत. लुत लागलेले कुत्रे चावले म्हणून तिच्या लहानपणी तिच्या वडिलांनी तिचे आवडते पिल्लू ठार केले. या घटनेचा मिसेस राणेंच्या बालमनावर मोठा आघात झाला. मिसेस राणे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना एक वेगळीच घटना घडते. राणेबाई घरी एकट्याच अर्ध वट झोपेत असताना एका मुलाने त्यांच्याशी संभोग केला. लग्नानंतर राणेंना सुखी संसार लाभला नाही. शारीरिक बाजूने त्यांची त्यांची कुचंबनाच झाली. अशा परिस्थितीत मिसेस राणे व विठ्ठल जामखेडकर एकत्र येतात. दोघांचा संभोग घडून येतो. त्यामध्ये राणेबाई पुढाकार घेतात. नायकाचा शरीरसंबंधाचा हा पहिलाच अनुभव असल्याने तो अनुभव उत्कटपणे घेण्याकडे त्याचा कल असतो. मिसेस राणेंसोबत झालेल्या संभोगात नायकाला आपल्या अस्तित्वाची तीव्र जाणीव होते. शरीरस्पर्शाचा विविध पातळीवरील शोध चित्रे या कथेत घेतात. मिसेस राणे यांना कुत्र्याच्या पिल्लाला स्पर्श, माकडीनीला त्याच्या मेलेल्या पिल्लाचा स्पर्श, आजीने विठ्ठलला केलेला स्पर्श या सर्व स्पर्श जाणिवातून चित्रे त्यांच्या अस्तित्वाचा वेध घेतात. ही कथा वाचून वाचकांना एका वेगळ्याच अनुभवविश्वाचा प्रत्यय येतो. भालचंद्र फडके चित्रे यांच्या कथेबाबत म्हणतात, "चित्र्यांची कथा विविधप्रतिक्रियाक्षम आहे, 'केसाळ काळंभोर पिल्लू' ही चित्र्यांची कथा विचारात घेतली तर तिच्या अंगी असलेल्या विविधप्रतिक्रियाक्षमतेची प्रचिती येते."[१६] आणि हे विधान समर्पकच वाटते.

'तिडीक, तिरडी आणि अनंतकाळ' ही कथा एका मध्यमवर्गीय नायकाच्या कातडीवचावू वृत्तीची व्यंगकथा आहे. चित्रे म्हणतात त्याप्रमाणे, "नायकाच्या मध्यमवर्गीय व फसव्या डिटॅचमेंटची मला टिंगल करायची होती."[१७] या कथेतील नायकाला (सदाशिवला) स्वच्छतेचे भयंकर वेड आहे. सारे जग अस्वच्छ आहे आणि आपण मात्र स्वच्छ आहोत असे त्याला वाटते. गर्दीत त्याला माणसांचा स्पर्श नकोसा वाटतो. निर्भयपणे जीवनाला स्पर्श करायची त्याच्यात हिम्मत नाही आणि म्हणून स्वत:च्या मनोविश्वात आपण स्वतंत्र आहोत. माणसांचे जग अस्वच्छ आहे, असा भोंदू व कातडीबचाऊ पवित्रा त्याने घेतला आहे. कथेच्या शेवटी एका स्वप्नसदृश्य दृश्यात लाखो कामगार सदाशिवची प्रेतयात्रा काढतात. पण त्याचे

मरणही खोटेच आहे हे कळून येताच कामगार मैदानावर नेऊन त्याला व्यासपीठावर नागवा करतात, इतकेच नव्हे तर त्याच्यावर सर्वासमक्ष होमोसेक्शुअल स्वरूपाचा हल्ला करतात. त्याक्षणी सदाशिवला आपल्या असली अस्तित्वाची जाणीव होते आणि अनंतकाळ संपुष्टात येतो. या कथेबाबत चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "इंद्रिय सुखाविषयी उदासिन राहिलेल्या तरूणाच्या विकृतीचा निर्भय वेध चित्रे घेतात."[१८] त्याचप्रमाणे स्वत:च्या अस्तित्वाबाबत खुळचट संकल्पना डोक्यात घेऊन वावरणाऱ्या प्रवृत्तीचा उपरोधात्मक वेध चित्रे या कथेत घेतात.

नर्गिसच्या भयावह अस्तित्वाची व्यथा 'स्कार्पिओ' या कथेतून चित्रे मांडतात. झपाट्याने नष्ट होत चाललेल्या पारशी समाजाचे चित्रण या कथेतून येते. नर्गिसचा मोठा भाऊ गुस्ताद हा जन्मत:च वेडा आहे. नर्गिसशिवाय तो जगूच शकत नाही. त्यांच पालनपोषण नर्गि स करते. ती नसली की गुस्तादला एकटे सोडून कुठेही जाता येत नाही, लग्नाचा विचार तर नर्गिसच्या दृष्टीने फार दूरचा विषय होतो. गुस्ताद हा वेडा असल्याने त्याच्या सर्व गरजा तिलाच भागवाव्या लागतात. अगदी शरीरसुखही त्याला नर्गिसकडून हवे असते. अशा परिस्थितीमुळे नर्गिसच्या जीवनाला कोंडलेपणा प्राप्त होतो. नर्गिसचे अस्तित्वच हरवून गेले आहे. अशावेळी नर्सिसच्या कॉलेजजीवनातील एक मित्र तिला तिच्या अस्तित्वाची जाणिव करून देतो. जीवनाबद्दलचा एक नवा दृष्टिकोण तिला देतो. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात त्याचप्रमाणे, "ही कथा उध्वस्त होत चाललेल्या प्रचंड दगडी शिल्पातून झळाळणाऱ्या चैतन्याचा जिवंत प्रत्यय देते."[१९] प्रत्येक व्यक्तीला जन्मापासूनच धर्माचे, जातीचे लेबल चिकटवले जाते. अशी वृत्ती माणूसकीला पोरकी बनते. माणसाला माणूस म्हणून जगता येत नाही, आणि एखाद्या पारशी समाजातल्या नर्गिसला आपल्या अस्तित्वशोधासाठी कसे धडपडावे लागते याचे चित्रण स्कॉर्पिओ या कथेतून येते.

### ३.१.२ महानगरीय कथा :

महानगरीय जीवन हे दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे एक प्रमुख आशयसूत्र आहे. १९६० नंतरची महत्त्वाची महानगरीय कथा त्यांनी लिहिली आहे. दुसऱ्या

महायुद्धानंतर आणि औद्योगिकरणामुळे भारतात शहरांची संख्या झपाट्याने वाढली. विविध व्यवसाय, उद्योगधंद्यांच्या केंद्रीकरणामुळे मोठ-मोठी नगरे, महानगरे अस्तित्वात आली. उद्योगधंद्यांच्या निमित्ताने, व्यवसायाच्या निमित्ताने रोजगार मिळविण्यासाठी खेड्यातील लोक शहराकडे धाव घेवू लागले. त्यामुळे नागरी भागातील लोकसंख्या भरमसाठ वाढली. या भरमसाठ वाढलेल्या लोकसंख्येमुळे शहराभोवती झोपडपट्ट्यांची बेसुमार वाढ झाली. कमी जागेमध्ये बहुसंख्य लोक दाटीवाटीने वस्ती करून राहू लागले. त्यामुळे घरे, स्वच्छता इत्यादी सुविधांचे प्रश्न निर्माण झाले. रोजगारधंद्याच्या निमित्ताने वेगवेगळ्या जाती-धर्मांचे लोक एकत्र राहू लागल्याने महानगरांना एक प्रकारचा सांस्कृतिक अक्करमाशेपणा प्राप्त झाला. व्यवसाय, उद्योगधंद्यांच्या विकासाबरोबरच नागरी भागांचा विकास होत होता. एकीकडे आधुनिकीकरण तर दुसऱ्या बाजूला बेसुमार लोकसंख्यावाढीमुळे नागरी परिसरात दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारीचे प्रमाणही भरमसाठ वाढले. जगण्याच्या धडपडीतून माणसामाणसामध्ये स्पर्धा निर्माण झाली आणि या स्पर्धेमधून हिंसा निर्माण झाली. या संदर्भात चित्रे एके ठिकाणी म्हणतात, "प्रचंड प्रमाणावर आज पृथ्वीवरल्या महानगरात आणि शहरात निरंतन, दैनंदिन हिंसा चालू आहे. लोकसंख्येचा घर्षणातून ही हिंसा उत्पन्न झाली आहे. दाटीवाटीच्या वस्त्यांमध्ये, गर्दी गोंगाटाने गजबजून गेलेल्या घरांमध्ये, मानवी व्यक्तीला खाजगी अवकाशच उपलब्ध नाही. प्रत्येक पशुपक्षाला स्वत:च्या वापरासाठी निसर्गत:च एक आपला अवकाश लागतो. तो मिळाला नाही तर पिंजऱ्यातले उंदिरसुद्धा एकमेकांवर हल्ले करू लागतात आणि गुन्हेगारी वर्तन करू लागतात."[२०] त्याचबरोबर या अफाट पसरलेल्या महानगरात माणूसकीला कवडीमोल प्राप्त झाले आहे. माणसापेक्षा पैसा श्रेष्ठ ठरू लागला. "पैसा हे अंतिम मूल्य मानून जगणाऱ्या अठरापगड जात-पात-वंश-धर्माच्या शहरी समाजात एकविसाव्या शतकातल्या अनेक समस्या वणव्यासारख्या पसरत जाणार आहेत."[२१] अशाप्रकारे पैसा हा महानगरीय माणसाचा केंद्रबिंदू बनून एक भोगवादी, चंगळवादी, संस्कृती आकारास आली आणि माणसाचे जीवन गुंतागुंतीचे बनले.

१९६० नंतरच्या औद्योगिकरणाचा, आधुनिकीकरणाचा परिणाम साहित्यक्षेत्रावरही झाला. आधुनिकीकरणाचा अविष्कार मराठी साहित्यातील कविता, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकारातून प्रभावीपणे उमटलेला दिसतो. अनेक साहित्यिकांनी महानगरीय जीवन शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात प्रामुख्याने जी. ए. कुलकर्णी, कमल देसाई, श्री. दा. पानवलकर, श्याम मनोहर, भाऊ पाध्ये, विलास सारंग, भारत सासणे, अरूण साधू इत्यादींचा समावेश करता येईल. महानगरीय जाणिवा आपल्या साहित्यातून व्यक्त करणारे दिलीप चित्रे हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. चित्रे यांची कथा मुंबईसारख्या महानगरातच घडते. मुंबई महानगराची अनेकविध वैशिष्ट्ये त्यांच्या कथात्म साहित्यातून पहावयास मिळतात. याबाबत म. द. हातकणंगलेकर म्हणतात, "चित्र्यांची कथा वरवर पाहता मुंबईतच घडते पण ही मुंबई निराळी आहे. झोपडपट्टीतील नव्हे तर बंगल्यातील, कचेरीतील, हॉस्पिटलमधील, स्टेशनावरील खरे पाहता तरारणाऱ्या अग्रशतांतून अस्तित्वाचा आशय शोषणाऱ्या संवेदनाकंदाची ही मुंबई आहे."[२२] चित्रे यांच्या ऑर्फियस या कथासंग्रहातील कथा या महानगरीय जीवन, जाणिवा व्यक्त करणाऱ्या आहे. महानगरातील गर्दीचे जीवन, महानगरीय व्यक्तीचे एकाकीपण, आत्मकेंद्रितता, घुसमट, भयाची जाणिव, स्त्री-पुरुष संबंधातील कोंडमारा चित्रे आपल्या कथांतून मांडतात. त्यादृष्टीने चित्रे यांच्या 'मेथिड्रिन', 'केसाळ काळंभोर पिल्लू', 'वांसासि जिर्णानि' या कथा उल्लेखनीय आहेत. महानगरातून वावरणाऱ्या व्यक्तीचे जीवन इतके क्षुद्र बनत चालले आहे की त्याने आपलाच चेहराच हरवला आहे. एकाकीपणाच्या, परात्मतेच्या, निराशेच्या, नियतीच्या घाल्याने तो एकटा पडला आहे, अस्तित्वहीन झाला आहे. अशा चेहराहीन, अस्तित्वहीन माणसाचे जगण्यासाठी चाललेल्या धडपडीचे चित्रे आपल्या कथांतून करतात.

'केसाळ काळंभोर पिल्लू' या कथेतून मुंबई महानगरातून एकाकीपणे फिरणाऱ्या आणि स्वत:चे अस्तित्व हरवून गेलेल्या विठ्ठल जामखेडकरचे चित्रण येते. चित्रे यांची कथा प्रामुख्याने मुंबईसारख्या महानगरातच घडते. या महानगरामध्ये अस्तित्वहीन झालेल्या माणसांचे चित्रण ते आपल्या कथेतून करतात. पैसाकेंद्री महानगरात पैसा हेच माणसाचे सर्वस्व असल्याचे

16352

दिसून येते. पण इथे माणसांच्या मनाचा, भावनांचा, गरजांचा विचार गौण ठरविण्यात येतो. पण पैसा सर्व प्रकारचे सुख देऊ शकत नाही. उदाहरणार्थ याच कथेतील मिसेस राणे पैसा, बंगला, मोटार, नोकरी इत्यादी सर्व सुखसोयी असून ही एकाकीच आहेत. एकाकीपणा हे अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचे एक मुख्य सूत्र आहे. त्याचा आविष्कार चित्रे या कथेतून करतात. विठ्ठल जामखेडकर हा सुद्धा एकाकी जीवन जगणारा आहे. लहानपणी ज्या कुत्र्याच्या पिल्लावर राणेबाईंचा जीव होता त्याला लूत लागलेले कुत्रे चावले म्हणून त्यांच्या वडिलांनी त्या पिल्लाला गोळ्या घालून ठार मारले. राणेबाई कॉलेजमध्ये असताना एका लहान मुलाने त्यांच्याशी संभोग केला. पुढे लग्न झाल्यावरही त्यांना शरीरसुख मिळाले नाही. त्यामुळे एकूण जीवनाबद्दलच त्यांच्या मनामध्ये अनास्था निर्माण होते. दुसरीकडे विठ्ठल जामखेडकर हा पत्तीशी उलटून गेलेला, हस्तमैथुन व स्वप्नसंभोग करणारा, एकाकी असणारा व एकूणच 'लॉस ऑफ आयडेंटिटि' ची जाणीव झालेला माणूस आहे. राणेबाई व विठ्ठल जामखेडकर यांच्यात शरीरसंबंध घडून येतो. दोन्ही शरीरे पेटून उठतात. या संबंधातच विठ्ठलला आपल्या अस्तित्वाची जाणिव येते. शेवटी राणेबाईंचा मृत्यू होतो. हत्या की आत्महत्या या संभ्रमात ही कथा संपते. अशाप्रकारे महानगरीय जीवनातील एकाकी, अस्तित्वहीन अशा माणसाची शोकांतिका ह्या कथेतून चित्रे यांनी रेखाटली आहे.

महानगरीय जीवनामध्ये एकाकीपणे जीवन जगणाऱ्या कुलकर्ण्यांची व्यथा 'वासांसि जीर्णानि' या कथेतून प्रत्ययास येते. दादरला एका जुनाट चाळीच्या वरच्या मजल्यावर ते एकटेच राहत असतात. कुलकर्ण्यांचे एकूणच व्यक्तिमत्व गूढ स्वरूपाचे आहे. अनुभवामृतातल्या काही ओव्यांचा विक्षिप्त पण मार्मिक अर्थ सांगणारी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. अध्यात्मावर त्यांचा गाढ विश्वास आहे. अध्यात्मिक चमत्काराच्या गोष्टी ते नायकाला सांगत. सत्पुरूषांच्या स्पर्शानं मेलेल्या व्यक्ती जीवंत होतात या विषयाने त्यांना झपाटलेले असते. चाळीमध्ये शेजारी राहणारी आठ-नऊ वर्षाची मुलगी त्यांच्या अध्यात्मिक चमत्कारापोटीच मृत्यू पावते. एकूणच महानगरीय जीवनात एकाकीपणे जीवन व्यक्त करणाऱ्या कुलकर्ण्यांचे चित्रण चित्रे यांनी प्रभावीरितीने रेखाटले आहे.

शहराबाजूच्या भागात असणाऱ्या सातमजली वेड्यांच्या इस्पितळात उत्कटपणे जगण्याची धडपड करणाऱ्या नायकाचे चित्रण 'टाइपरायटर' या कथेतून येते. इंदूमती शेवडे म्हणातात त्याप्रमाणे, "टाइपरायटर ही उत्कृष्ट कथासुद्धा एकप्रकारे व्यंगकथा आहे. असमानतेच्या चक्रातील दाते समान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व माणसांच्या नैसर्गिक प्रेरणांना व इच्छाशक्तींना दडपून त्यांना सारखी व समान घडवू पाहणाऱ्या यांत्रिक समाजाचे ते व्यंगचित्र आहे."[२३] अशा प्रकारच्या समाजामध्ये सामान्य आणि असामान्य घटना तटस्थपणे पाहिल्यावरही माणसाच्या सुखदु:खाचा अर्थ कळणे कठीण बनते. सर्व काही निरर्थक वाटून तो मूक व निर्विकार बनतो. म्हणून या कथेतील नायकाला वेडा ठरवून त्याला वेड्यांच्या इस्पितळात आणले जाते. बोलण्यात, वाचण्यात, लिहिण्यात ज्याचा वेळ चांगला जातो, सामान्य माणसासारखा वर्तन करणारा हा नायक डॉक्टरांना चमत्कारिक वाटतो, म्हणून त्याला नॉर्मल करण्यासाठी 'टाइपरायटर' देण्यात येतो. याच इस्पितळात एका तरूणाचे इंजिनियर होण्याचे स्वप्न कायम राहिले म्हणून त्याला वेडा ठरविण्यात आले. याच इस्पितळात नर्स असणाऱ्या एका तरूणीच्या स्त्री-सुलभ प्रेमभावना दडपून टाकण्यासाठी तिला पुरुषी हार्मोन्सची इंजक्शन दिली जातात. सामाजिक संकेत उल्लंघणारा नायक टाइपरायटर या कथेतून चित्रेंनी चित्रित केला आहे.

अशा प्रकारे दिलीप चित्रे यांच्या कथातून महानगरीय जीवनात एकाकीपणे अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या व्यक्तिरेखा आढळतात.

### ३.१.३ स्त्री-पुरुष मिलनातून अस्तित्व जाणीवा प्रकट करणाऱ्या कथा :

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे स्वरूप समकालीन इतर कथालेखकाहून भिन्न आहे. तिचे बलस्थान वेगळ्या स्वरूपात सामावलेले आहे. विशिष्ट परिणाम साधणाऱ्या, विशिष्ट अखेरी साधणाऱ्या भूमितीतील प्रमेयासारख्या वाटणाऱ्या फडके - खांडेकरप्रणीत कथेपेक्षा चित्रेंच्या कथात्म साहित्याचे स्वरूप निराळे तर आहेच पण जीवनदर्शनाच्या प्रसुप्त शक्तीची खरी कल्पना आणून देणाऱ्या गाडगीळांच्या, जी.ए.कुलकर्णींच्या कथेपेक्षाही चित्रे यांच्या कथांची घडण वेगळी आहे. विविध आशयसूत्रातून प्रकट होणारी चित्रे यांची कथा ही

विविधप्रतिक्रियाक्षम आहे. ती नीटपणे समजून न घेतल्यामुळे वाचक-समीक्षकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. पण पारंपरिक कथासाच्याला छेद देऊन आपले स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्यामध्ये चित्रे यांची कथा यशस्वी झालेली दिसते. याबाबत भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे, "चित्र्यांच्या कथांविषयी टीकाकारांपेक्षा टीकाखोरांनी रान पेटविलेले दिसते. परंपरेचा सरळ मार्ग जसा या कथेने सोडून दिलेला आहे. तसे कथांविषयीसंबंधी नव्या वाटा तिने शोधलेल्या दिसतात."[२४] आणि चित्रे यांच्या या नव्या वाटांनी मराठी कथा समृद्ध बनली आहे हे नाकारता येत नाही.

अस्तित्वशोध हे चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे प्रमुख आशयसूत्र असले तरी त्यांनी अस्तित्वाचा शोध हा दैहिक पातळीवरून घेण्याचा प्रयत्न केला आहे. चित्रे यांच्या बहुतांशी कथांतून स्त्री-पुरुष शरीरसंबंधाचे चित्रण येते. चित्रे यांच्या कथेमध्ये स्त्री-पुरुष संबंधाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या कथातील बहुतांशी व्यक्तिरेखा ह्या लैंगिक कृतीतूनच अस्तित्वाचा शोध घेतात. या पाठीमागे दोन कारणे असू शकतात. एक तर लैंगिक व्यापार हे स्त्री-पुरूष संबंधाचे व परस्पर शोधाचे साधन आहे तर दूसरीकडे टीकाकार म्हणतात त्याप्रमाणे, "व्यक्तीकेंद्री जाणिवेला फक्त लैंगिक व्यापारच जिवंत व उत्स्फूर्त वाटत राहतो."[२५] म्हणून देहशोधाला व स्पर्श भावनेला चित्रे यांच्या संपूर्ण अनुभवविश्वाच्या संदर्भात पाहिल्यास स्त्री-पुरूष संबंधाला इथे एक वेगळे परिमाण आहे. 'जाराचं स्वगत' या कथेतील 'मी' म्हणतो त्याप्रमाणे ती एक शाक्त-दृष्टी आहे. "प्रत्येक स्त्री-पुरूष संबंध हा प्रत्यक्ष शिवाचा आणि शक्तिचा संबंध आहे."[२६] या प्रकारच्या जीवनचित्रणात चित्रे एका बाजूला आधुनिक अस्तित्ववादाची ओळख करून देतात तर दुसऱ्या बाजूने भारतीय परंपरेतील शिव-शक्तीच्या शोधात शैवतत्त्वज्ञानही मांडतात.

चित्रे यांच्या कथेच्या नव्या वाटा, नव्या जाणिवा वाचक-समीक्षकांनी नीटपणे समजून न घेतल्यामुळे त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. पण त्यांच्या कथात्म साहित्याची सर्वांगाणे परिपूर्ण चिकित्सा होणे हे तितकेच गरजेचे आहे. बेडेकरांच्या मते अटळ मरण व विनाश, जिवंत राहण्याची सवय, या रिकाम्या जिवंतपणाला संवेदनांच्या, स्पर्शाच्या

खऱ्याखुऱ्या मानवी संबंधांच्याद्वारा अर्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न, या प्रेरणांच्या संघर्षातून व संघटनेतून चित्रे आपली कथा घडवितात, त्या प्रयत्नांतून समर्थ पण बीभत्स गारठा निर्माण होतो. त्यांच्या कथेतील स्त्री-पुरूष संबंधाच्या वर्णनाने वाचक विचकून जातो. शरीरनिदर्शक शब्दांनी आवाक् होतो. पण चित्रे वर्णित असलेल्या या जाणिवा त्यांच्या अनुभवांची प्रगल्भता सिद्ध करते. याबाबत म.द. हातकणंगलेकर म्हणतात, "खरे पाहिले तर चित्रे वर्णित असलेल्या देह जाणीवा या नुसत्या लैगिंक जाणीवा नाहीत. त्यामागील प्रेरणा अध्यात्मिकच आहे."[२७] त्यामुळे दिलीप चित्रे यांच्या विविधप्रतिक्रियाक्षम कथांमधील स्त्री-पुरूष संबंधाकडे एक विवक्षित दृष्टिने पाहणे गरजेचे ठरते.

'दहा हजार शब्द' या कथेतील प्रोफेसर लिहित असतात, "अर्थ आणि काम यांच्या साधनेभोवती माणसानं हजारो गुंतागुंतीचे विधी निर्माण केले आहेत. ह्या गुंत्यात अर्थ आणि काम कशासाठी याचं उत्तर कुठच मिळत नाही. त्यातलं मूळ सत्य सापडणं कठीण झालयं."[२८] लोनली वाटावं म्हणून प्रोफेसरांनी आपल्यापेक्षा पंधरा वर्षांनी लहान असणाऱ्या मुलीशी लग्न केलेलं असतं. विवाहात शारीरिक संबंधापेक्षा अधिक काहीतरी असलं पाहिजे असे त्यांना वाटते. पण नेमके अधिक काय आहे हे त्यांना उमगत नाही. आपल्या पत्नीला समागमाचे पूर्ण समाधान आपण देऊ शकत नाही याची जाणिव जेव्हा त्यांना होते, तेव्हा चारचौघात आपल्या कुणीतरी थोबाडीत देत आहे असे त्यांना वाटते. एकांताच्या क्षणीदेखील आपण एकटेच आहोत असा त्यांना भास होतो. अशाप्रकारे वैवाहिक जीवनातील समस्येचा वेध घेणारी ही कथा प्रोफेसरांच्या एकाकीपणाचाही वेध घेते. या कथेबाबत चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "स्त्री-पुरूषातल्या उत्कट शारीरिक संबंधाचे यांत्रिकीकरण करणाऱ्या पती-पत्नी संबंधावर चित्रे आघात करतात."[२९] हे विधान रास्तच ठरते.

स्त्री-पुरुष संबंधाच्या चित्रणातून मानवी अस्तित्वाचा शोध घेणारी 'केसाळ काळंभोर पिल्लू' ही चित्रे यांची एक महत्त्वाची कथा आहे. चित्रे यांच्या कथातील सर्वच पात्रे एकाकीपणे जगत राहतात. दुसऱ्या माणसांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करूनही ती एकाकीच राहतात. स्त्री-पुरुष संबंधाला चित्रे यांनी नीति-निरपेक्ष व संकेतातील स्थान दिल्यामुळे देहाला,

त्यांच्या क्रियांना व वर्णनालाही त्या संबंधाप्रमाणे एक वेगळी पातळी या कथेत लाभली आहे. देह हा अस्तित्वशोधाचा मूलाधार आहे. त्यांच्या व्यक्तिरेखा प्रेमाच्या, मृत्यूच्या, मीलनाच्या, भीतीच्या सारांशाने कुठल्याही संघर्षाच्या प्रसंगीही देहजाणीव विसरत नाहीत. उलट ती अशा प्रसंगी अधिक उत्कट व तीव्र होते. म्हणून त्यांच्या कथात्म साहित्यात लैगिंक अवयववाचक शब्द, वर्णने, देहाची उघडीनागडी रूपे सहजगत्या यावी तशी येतात. पण या सर्व चित्रणामागील चित्रेंची भूमिका अध्यात्मिकच आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. 'केसाळ काळंभोर पिल्लू' मधील विठ्ठल महादेव जामखेडकर व त्याची वरीष्ठ अधिकारी असणारी राणेबाई यांच्या शरीरसंबंधातून दोघानांही आपल्या असतेपणाची तीव्र जाणिव होते आणि हेच या कथेचे यश म्हणावे लागेल. दि.के.बेडेकर म्हणतात त्याप्रमाणे, "या कथेमध्ये जे सामर्थ्य आहे ते यात सांगितलेल्या मानवी मनातल्या स्पर्शाच्या ओढीमध्ये आहे. ही ओढ किती नाजूक व प्रबळ असू शकते, हिच्या अभावी माणसाचे मन व सारे अस्तित्वच कसे गारठून जाते हे चित्र्यांनी मोठ्या हृदयस्पर्शी रीतीने सांगितले आहे"[३०] एकूणच काम प्रेरणा ही माणसाची आदिम प्रेरणा आहे. आधुनिक काळात या काम प्रेरणा यांत्रिक स्वरूपाच्या बनत आहेत या समस्येवरच चित्रे प्रकाशझोत टाकतात.

स्त्री-पुरुषांमध्ये असणाऱ्या वासनात्मक गुंतागुंतीच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकणारी 'अंधारातला अप्रेंटिस' ही एक महत्त्वाची कथा आहे. या कथेतील निरंजन, सावंत, उषा, मिसेस मांजरेकर हे सर्वजण एका सामाजिक चळवळीत काम करतात. उषाच्या स्वभावाचा फायदा घेऊन सावंत तिच्याशी सलगी करू पाहतो. पण उषाचे निरंजनवर प्रेम असते. दोघेही लग्न करणार असतात. उषा निरजंन कडे सावंत बाबत तक्रार करते. लग्नाआधी निरंजन-उषाचे संबंध घडून येतात. नंतर दोघे लग्न करतात. त्यांच्या दोघांच्या लग्नात सावंत शिव-पार्वतीचं शिल्प भेट देतो. पण निरंजनला त्या शिल्पातील शिव सावंतसारखा दिसतो. अशाप्रकारे निरजंन-उषा-सावंत या तिघांचा वासनिक पातळीवरील संबंधाच्या व त्यातून होऊ पाहणाऱ्या विध्वंसाचा वेध चित्रे या कथेत घेतात. चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील स्त्री-पुरुष संबंध हे चित्रविचित अशा जाणिवांचे रसायन आहे. या रसायनात अशा संबंधाला समाजाने

दिलेली वेगवेगळी संकेतरूपे आणि त्या संकेतरूपांना चिटकून येणाऱ्या पवित्रापवित्रेच्या कल्पना आहेत. त्यात स्त्री आणि पुरुष यांच्या विशिष्ट देहजाणिवा आहेत. आणि त्या नुसत्याच शृंगाराशी किंवा लिंगाशी संबंधित नसून त्या देहाशी निगडीत अशा अध्यात्मिक जाणिवा आहेत, हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. 'स्कॉर्पिओ' या कथेतील नायक व नर्गिसच्या शरीरसंबंधाला हीच अध्यात्मिक जाणिव एक प्रकारची उंची प्राप्त करून देते. झपाट्याने कमी होत चाललेल्या पारशी समाजाच्या चित्रणाबरोबरच मानसिक संतुलन बिघडलेल्या गुस्तादची भयंकर व्यथा चित्रे यांनी या कथेत मांडली आहे. एकाकीपणे जीवन जगणारी नर्गिस आपल्या वेड्या भावासाठी आत्मसमर्पन करण्यास तयार असते. स्वत:च्या भावना, वासनांचा त्याग करू पाहणाऱ्या नर्गिसला कोणाचाही आधार नसतो. अशावेळी नायकाच्या सहवासातून तिच्या कोंडलेल्या अवस्थेला प्रवाही करण्याचा प्रयत्न चित्रे यांनी या कथेद्वारे केला आहे.

अशाप्रकारे चित्रे यांची कथा स्त्री-पुरुष संबंधातून अस्तित्वाचा शोध घेणारी आहे. अस्तित्वशोधाच्या संदर्भात उपरोक्त कथांचा विचार केला तर त्यातील स्त्री-पुरूष संबंध, असांकेतिक देह-वर्णने एका वेगळ्या जाणीवेने केलेली दिसून येतात. एकूणच स्त्री-पुरुष संबंधाकडे चित्रे एका वेगळ्या दृष्टीने पाहतात. ही दृष्टी त्यांना अध्यात्मातून मिळालेली आहे. आदिम प्रेरणा उत्कटपणे प्रकट करताना चित्रे स्त्री-पुरुष संबंधाला एक वेगळेच परिमाण देतात.

## ३.१.४ जीवनाचा उत्कट शोध घेणाऱ्या कथा :

दिलीप चित्रे हे एक प्रयोगशील कथालेखक आहेत. पारंपरिक आदर्शवादी, जीवनवादी कथांपेक्षा चित्रे यांच्या कथा पूर्णत: वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. अस्तित्ववादी जाणिवा प्रकट करण्यासाठी चित्रे आपल्या कथांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या प्रयोगशिलतेचा मार्ग अवलंबताना दिसतात. ही प्रयोगशिलता कथावस्तूच्या आशय-विषयापासून ते थेट निवेदन पद्धतीपर्यंत दिसून येते. जीवनाचा उत्कट शोध घेणे हे दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे महत्त्वाचे आशयसूत्र आहे. मानवी जीवनाच्या

अस्तित्वाचा शोध ते घेतात. त्यादृष्टीने 'जाराचं स्वगत' आणि 'प्रतिभावंताचं मरण' या दोन कथा उल्लेखनीय आहेत.

चित्रे यांच्या कथात्म साहित्यात 'प्रेम' या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. जीवनाचा प्रत्येक क्षण उत्कटपणे जगताना तसेच स्वत:चे वैशिष्ट्य कायम ठेऊन जगताना आजच्या भारतीय सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात अनेक प्रकारच्या नीतीनियमांना, सामाजिक संकेतांना चित्रे झुगारून देतात. 'जाराचं स्वगत' ही कथा त्या दृष्टीने विश्लेषणिय आहे. या कथेत चित्रे माणसामाणसातील उत्कटतेविषयी मूलगामी स्वरूपाचे विचार मांडतात. सामाजिक संकेताना झुगारून उत्कटपणे जगण्याची धडपड करणाऱ्या एका नायकाचे चित्रण या कथेत येते. उत्कटता ही अस्तित्वाची एकमेव कसोटी आहे. असे त्याला वाटते आणि लोक अगदी विसराळूपणे, झोपेतल्यासारखे जगत असतात याचे याला आश्चर्य वाटते. वैचारिक स्वगत आणि अंतर्मुख अनुभव या दोहोंतून ही कथा उलगडत जाते. पाप-पुण्यांच्या, शरीर-अशरीरी भेदाच्या पलीकडे गेलेला प्रणयानुभव ते चित्रित करतात. संकेतांना झुगारून उत्कटपणे जगणाऱ्या या नायकाला अपराधी वाटते. या कथेतील चिंतनातून चित्रे स्त्री-पुरुष संबंधावरही आघात करतात. प्रत्येक स्त्री-पुरुष संबंध हा शिवाचा आणि शक्तीचा संबंध आहे असा विचार ते इथे मांडतात. पण हे संबंध फक्त शारीरिक पातळीवरचे नाहीत तर हा एक प्रकारे वरवरचे संबंध तोडून चिरप्राचीन संकेताला भिडण्याचा प्रयत्न आहे. या कथेबाबत चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात त्याप्रमाणे, "परंपरागत कथा शिल्पावर आघात करणारी ही कथा आहे. कारण परंपरागत वैचारिक धारणेवरही ती आघात करते. वैचारिक स्वगत आणि अन्तर्मुख अनुभवाला भिडून प्रकट होणारी कथा त्यांच्या सीमारेषेवरचे हे प्रभावी लेखन आहे. प्रेम या संकल्पनेभोवतीचे, सवयींचे, रूढींचे, परंपरांचे, जुनाट नैतिक संस्कारांचे कवच भेदून अंतरीच्या उत्कट अनुभवाने केलेली प्रेमाची ही गाथा कथारूप न हरवता अप्रतिम वैशिष्ट्यपूर्ण अनुभवाची प्रतीती देते."[३१] अशा प्रकारे जीवनातील चैतन्यपूर्ण, सर्जनशील प्रेरणांचा पुरस्कार करणारी एकाच वेळी पारंपरिक संस्कृतीविरूद्ध आवाज उठवणारी ही कथा वाचकांना अपराधीपणाची तीव्र जाणिव करून देऊन अंतर्मुख बनविणारी आहे.

जीवनाचा उत्कटपणे शोध घेणारी 'प्रतिभावंताचं मरण' ही आणखी एक महत्त्वाची कथा आहे. या कथेतील निवेदकाने तीन प्रतिभावंताची मरणे पाहिली आहेत. "तिघांच्या तीन तऱ्हा. त्यातला एक खरोखरीचा कलावंत, दुसरा फसविण्याचा धंदा करणारा मुळात स्वत:लाच फसवणारा एक भ्याड अन् दुबळा माणूस, आणि तिसरा समाजात वर चढू न शकलेला एक बुद्धिमान मनुष्य."[३२] परंतु माणूस प्रतिभावंत असला तरी त्याला आपले भवितव्य घडविता येत नाही. माणसाच्या मूळ घटनेतच एक अतिसुक्ष्म लिपी आहे. शक्यतांचा एक बहर आहे. आणि ही लिपी थोडी जरी विचलीत पावली तरी एक चमत्कारीक कॅन्सर त्यांच अस्तित्व खाऊन टाकतो. बहुसंख्य साधे लोक जन्मत:च मेलेले, तर बहुसंख्य प्रतिभावंत चा कॅन्सरने कुरतडलेले, असा हा प्रचंड मानवी अपव्यव आहे का ? याचा शोध म्हणजे ही कथा आहे. अशा तीन प्रतिभावंतांचे मरण निवेदक पाहतो. या प्रतिभावंतांची मरणे वेगवेगळ्या पातळीवरची आहेत. मुळात ते आत्मप्रेमी राहतात. प्रतिभेचा का होईना अंगठा चोखत बसतात. त्यांच्या निर्मितीला नवा विषयच मिळत नाही. लेखनात विराट अहंकार गुंतवतात पण त्यात आस्था आणू शकत नाहीत. मित्रांशीही ते दळणवळण प्रस्थापित करू शकत नाहीत. अशा प्रकारच्या तीन प्रतिभावंतांची स्वभावलक्षणे चित्रे प्रकट करतात. या तीनही व्यक्तिरेखा जीवनाचा उत्कट शोध घेणाऱ्या आहेत, त्यांचे चित्रण या कथेत येते.

### ४. 'चतुरंग' मधील आशयसूत्रे :

दिलीप चित्रे यांचा 'चतुरंग' हा लघुकादंबरी संग्रह १९९५ साली प्रसिद्ध झाला. 'चतुरंग' मध्ये चार लघुकादंबऱ्यांचा समावेश आहे. 'सॅफायर', 'रुधिराक्ष', 'द फुल मून इन विंटर' व 'एब्राहामची वही' या चारही लघुकादंबऱ्यातून दिलीप चित्रे यांच्या अनुभवविश्वाचा एक नवा पैलू पहावयास मिळतो. चित्रे म्हणतात त्याप्रमाणे, "चतुरंग ह्या पुस्तकातील लेखन वीसेक वर्षातल्या माझ्या कथाकादंबरी गद्याचे प्रातिनिधिक रूप आहे."[३३] महानगरीय एकाकी जीवन, जगण्यातला फोलपणा, निराशा, नियतीशरणता, परात्मता, चिंतनशिलता इत्यादी विविध सूत्रे 'चतुरंग' या लघुकादंबरीसंग्रहातून प्रत्ययास येतात. १९६८ साली प्रकाशित झालेल्या 'ऑर्फियस या कथासंग्रहाची आशयसूत्रे व १९९५ साली प्रकाशित झालेल्या 'चतुरंग' या

लघुकादंबरी संग्रहाची आशयसूत्रे यामध्ये बऱ्याच अंशी साम्य दिसून येते. 'चतुरंग' मधील चारही लघुकादंबऱ्यांना महानगरीय पार्श्वभूमी लाभली आहे. महानगरातील मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा शोध चित्रे या लघुकादंबऱ्यातून घेतात. मुंबई महानगरात घडणाऱ्या त्यांच्या कथात्म साहित्यकृतीतून मुंबई महानगराची अनेकविध रूपे पहावयास मिळतात. त्याबाबत चित्रे म्हणतात, "चतुरंग मधले एक अंत:सूत्र म्हणजे मुंबई शहराची त्यातली सृष्टी. इंग्रजीत ह्या चार कादंबरिकांचे वर्णन मी 'बॉम्बे क्वार्टेट' असे करीन."[३४] अशाप्रकारे 'चतुरंग' हा लघुकादंबरीसंग्रह विविध आशयसूत्राने व्यक्त झाला आहे.

मराठीत 'लघुकादंबरी' या साहित्यप्रकारात फार कमी लेखन झालेले दिसून येते. कथा, दीर्घकथा यातून लघुकादंबरी हा वाङ्मयप्रकार विकसित झालेला आहे. लघुकादंबरी म्हणून मराठीत अनेक कादंबऱ्याना समीक्षकांनी दुजोरा दिलेला आहे. लघुकादंबरीला कादंबरीका, छोटी कादंबरी अशी पर्यायी नावे आहेत. दिलीप चित्रे आपल्या लघुकादंबऱ्यांना 'कादंबरीका' असे संबोधतात. मर्यादित जीवनाचे समग्र तरीही कथेच्या तुलनेत व्यापक व कांदबरीच्या तुलनेत लघुदर्शन घडविणारी व कादंबरी तंत्राने विकसित होणाऱ्या कथात्म साहित्यकृतीस लघुकादंबरी म्हणता येईल. मर्यादित व्यक्तिजीवनाचा जीवनपट उलगडत नेणे किंवा विशिष्ट जीवनखंडाचे कादंबरी तंत्राने चित्रण मर्यादित वर्तुळात सखोल, समग्र चिंतन हे लघुकादंबरीचे तंत्र ठरते. त्यानुसार चित्रे यांच्या कादंबऱ्यांना लघुकादंबरी म्हणणे योग्य ठरते.

'चतुरंग' या लघुकादंबरी संग्रहाची आशयसूत्रे पाहण्यापूर्वी चित्रे यांच्या संबंध साहित्यलेखनावर प्रभाव असणाऱ्या अतिवास्तववादी विचारसरणीचा परामर्श घेण महत्त्वाचे ठरते. 'चतुरंग' मधील चारही लघुकांदबऱ्यावर अस्तित्ववादी तसेच अतिवास्तववादी विचारप्रणालीचा प्रभाव आहे व तो समजून घेणे आवश्यक आहे.

## ४.१ अतिवास्तववादी विचारप्रणाली :

Surrealism ही पाश्चिमात्य विचारसरणी मराठीत अतिवास्तववाद या नावाने ओळखली जाते. या विचारप्रणालीचा उगम फ्रान्समध्ये झाला. आंद्रे ब्रेताँ हा या

विचारप्रणालीचा प्रवर्तक म्हणून ओळखला जातो. या विचारसरणीच्या उदयास पहिल्या जागतिक महायुद्धाचा अनुभव, या अनुभवातून उदयास आलेला दादावाद व फ्रॉइडचे मनोविश्लेषण अशी तिहेरी पार्श्वभूमी लाभली आहे. "नियमितता, तार्किकता, आकृतिबंध, संतुलन इत्यादी गोष्टी पलीकडे जीवनात जे अस्थिर, विस्कळीत, अव्याकरणीय, विमुक्त असे आहे त्याला कलेत स्थान द्यावयाचे या उद्देशाने अतिवास्तववादी चळवळ सुरू झाली."[३५] अतिवास्तववादी लेखनात मानवी मनाच्या जाणिवेपलीकडील स्वप्नावस्थेतील जग, अज्ञात लैंगिक प्रेरणा व अभाविक शारीरिक क्रिया यावर आधारलेले जे वास्तव प्रकट होते. यांच्या जाणिवेचे लेखन असते. अतिवास्तववादी जाणिवेला सिग्मंड फ्रॉईडच्या मानसशास्त्राचा आधार आहे. मानवी अस्तित्वाविषयी एक निराळी, नवी जाणिव अतिवास्तववादी लेखनातून प्रकट होते. माणसाच्या जीवनातील साऱ्या कृतींना बुद्धीकडून चालना मिळण्याऐवजी अज्ञात, सुप्त मनाच्या प्रेरणांकडून चालना मिळायला हवी, असे या वादाच्या प्रणेत्यांचे मत होते. वास्तवा पलिकडच्या वास्तवाचा शोध अतिवास्तववाद्यांना घ्यावयाचा होता. हा शोध घेत असताना त्यांना रूढ, पारंपरिक, चाकोरीबद्ध सामाजिक सांकेतिक भाषा अपुरी वाटू लागली, म्हणून अतिवास्तववाद्यांनी रूढ, पारंपरिक, चाकोरीबद्ध भाषेची मोडतोड केली. नव्या भाषेबरोबरच नवी तंत्रे आत्मसात केली. परिणामी अतिवास्तववाद्यांनी वेगळी, स्वतंत्र अशी शैली निर्माण केली. हे सर्व करताना अतिवास्तववादी लेखनात दुर्बोधता येऊ लागली. पुढे दुर्बोधता हे अतिवास्तववादी लेखनाचे एक वैशिष्ट्य बनले. पारंपरिकतेच्या जुन्या वाटा झुगारून देऊन एक नवीन जाणिव अतिवास्तववादाने करून दिली म्हणून साहित्याच्या क्षेत्रात या वादाची भूमिका महत्त्वाची ठरते. रा.ग.जाधव म्हणतात त्याप्रमाणे, "अतिवास्तववाद केवळ एक तांत्रिक प्रयोग नसून एक प्रकारची मनोवृत्ती आहे. २० व्या शतकातील मूल्यविहीन मानवी समाजाची आत्मशोधनाची प्रामाणिक गरज आपल्या परीने भागविण्याचे सामर्थ्य या वादात आहे."[३६] मानवी जीवनाच्या विस्कळीतपणाचा वेध वास्तवाच्या पलिकडे जाऊन घेतला जाऊ लागला आणि साहित्यविश्वात अतिवास्तववादी विचारसरणीचा उगम झाला.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दुसऱ्या महायुद्धानंतर अतिवास्तववादी प्रवृत्तीच्या खुणा मराठी साहित्यविश्वात दिसू लागल्या. पाश्चात्य जगातील तिहेरी पार्श्वभूमीपैकी (दुसरे महायुद्ध, दादावाद, फ्रॉईडचा सिद्धांत) फ्रॉईडचे मनोविश्लेषण एवढे एकच अंग मराठीतील अतिवास्तववादी प्रवृत्तीला लाभले आहे. साहजिकच पाश्चात्य अतिवास्तववादाच्या तुलनेत मराठीतील अतिवास्तववाद संकुचित आहे. दिगंबर पाध्ये म्हणतात त्याप्रमाणे, "व्यक्तीच्या बाह्य व्यापाराचे मूळ त्याच्या गुंतागुंतीच्या आंतरिक मनोव्यापारात आहे. या गृहीतकृत्यातून मराठीतील अतिवास्तववादाचा अविष्कार झाला आहे."[३७] मराठी साहित्यात अतिवास्तववादाच्या खुणा आढळतात परिपूर्ण अतिवास्तववादी लेखन मराठीत आढळत नसले तरी चिं. त्र्य. खानोलकर, सदानंद रेगे, कमल देसाई, विलास सारंग, श्याम मनोहर, राजीव नाईक, मकरंद साठे त्याचप्रमाणे दिलीप चित्रे यांच्या साहिलेखनावर या विचारप्रणालीचा परामर्श घेतल्यानंतर दिलीप चित्रे यांच्या 'चतुरंग' या लघुकादंबरी संग्रहाची आशयसूत्रे पाहूयात.

## ४.२ जादूमय यंत्रात्मकतेचा आविष्कार - 'सॅफायर' :

'चतुरंग' या लघुकादंबरीसंग्रहातील पहिलीच लघुकादंबरी 'सॅफायर' चित्रे यांच्या अतिवास्तववादी जाणिवेची साक्ष पटवून देते. मानवी जीवनातील अतर्क्यतेचा, अद्‌भुततेचा शोध चित्रे या लघुकादंबरीद्वारे घेतात. सॅफायर नावाच्या एका अंगठीत जडविण्याच्या खड्याभोवती ह्या लघुकादंबरीचे कथानक फिरत राहते, आणि वाचकांना ती एक अद्‌भुत जादूमय यंत्रात्मकतेचा आविष्कार देते. या संबंध लघुकादंबरीतून गूढतेचा प्रत्यय येतो मानवी जीवनाच्या अवतीभवती आढळणाऱ्या अनेक गोष्टीत, वस्तूमध्ये अद्‌भुतता भरलेली असते. या सर्वांचा शोध घेताना एका विशिष्ट अनुभवाचा प्रत्यय येतो. तो प्रत्यय वाचकांना गूढ अनुभव देतो. जादूमय यंत्रात्मकतेला हाच अनुभव अभिप्रेत आहे. प्रथमपुरूषी निवेदनातून ही लघुकादंबरी उलगडत जाते. या कादंबरीतील कथासूत्राचा लेखकाच्या जीवनानुभवाशी काही संबंध असावा असे स्वत: चित्रे यांनी नमूद केले आहे. पुस्तकरूपाने येण्यापूर्वी ही लघुकादंबरी पुण्याच्या राजहंस मासिकाच्या दिवाळी अंकात १९७० च्या आसपास प्रकाशित झाली.

अफाट पसरलेल्या या विश्वाचे गूढ मानवाला पावलो-पावली अचंबित करते. या विश्वात घडणाऱ्या अनेक घटनांचा संबंध माणसाने ग्रह, तारे, रत्नांशी जोडला. पृथ्वीच्या पोटात माणसाला रत्नं आढळली वस्तुत: हे नुसते दुर्मिळ खनिज पदार्थ दगड, स्फटिक विविध धातू किंवा मूलद्रव्यामुळे त्यांना विविध रंग प्राप्त झाले. हे तेजस्वी दगड पाहून माणूस थक्क झाला. त्याला ते अद्‌भूत वाटले. ही रत्नं त्याला आकाशातल्या, नक्षत्रांसारखी, चंद्र-सूर्या सारखी वाटली. त्यांचा संबंध अनाकलनीय, आश्चर्यकारक चमत्कारांशी जोडला गेला. देवतांशी, पिशाच-समंधांशी, प्राण्यांशी, वनस्पतींशी त्याने त्यांचा संबंध जोडला. पण चित्रे म्हणतात त्याप्रमाणे, "माणसानं रत्नांना जो अर्थ दिला आहे तो चुकीचा किंवा बरोबर नसतो तो फक्त अर्थ असतो. त्याचा ज्या सत्याशी संबंध आहे ते सत्य त्या रत्नाशी निगडीत नसून माणसाच्या अस्तित्वाशी, विश्वातल्या कोणत्याही वस्तूला आणि घटनेला स्वत:च्या संदर्भात स्वायत्त अर्थ देण्याच्या क्षमतेशी निगडीत आहे."[३८] अशाप्रकारचेच एक रत्न आहे ते म्हणजे सॅफायर : नीळ : इंद्रनीळ : नीलम. या रत्नातून मानवी जीवन सुखी करू पाहणाऱ्या नायकाला अद्‌भुततेचा प्रत्यय कसा येतो ते चित्रे यांनी 'मी' या व्यक्तिरेखेद्वारे स्वानुभवातून या लघुकादंबरीमध्ये मांडले आहे.

लघुकादंबरीच्या नायकाला सॅफायर घेण्याचा मोह पडतो. पण या सॅफायर भोवती गूढतेचे, अद्‌भुततेचे वलय फिरत असते. हा खडा लाभला तर तो तुमच्या नशिबाला पंख लावून जाईल पण तो लाभला नाही तर तुमच्या जीवनाची शोकांतिका अटळ आहे. "कोणीतरी एखाद्या ग्लासात निळभोर तेजस्वी पेय ओतून द्यावं आणि म्हणावं की शंभरातल्या नव्व्याण्णव लोकांसाठी हे कालकूटासारखं जालीम ठरतं खरं, पण ज्या एखाद्याला हे लाभतं त्याला अमरत्व आणि आजन्म तारूण्य प्राप्त होतं."[३९] जसा या खड्याचा लौकीक आहे. जीवनाच्या बाबतीत हा धाडसी निर्णय ठरेल. नायक हा खडा आजमावून पहायचा ठरवतो. नायकाच्या मैत्रिणीच्या (सुमित्राच्या) दीराचा सर्वनाश याच खड्यामुळे झाला आहे. तिच्या जाऊबाईंना वेड लागले, ग्रॅज्युएट झालेला मुलगा काहीतरी भानगड करून पळून गेला, धंद्यात खोट आली. संपूर्ण घराचा सत्यानाश या खड्यामुळे झाला. हे सर्व माहिती असूनही नायकाला

सॅफायर घेण्याचा मोह आवरत नाही. सॅफायर घेण्याच्या मताशी तो ठाम राहतो. नायकाच्या आजोबांचा मृत्यूही याच खड्यामुळे झालेला असतो. आजोबा एक झवेऱ्याच्या पेढीवर नोकरीला होते. रत्नांची पारख त्यांच्याजवळ उत्तम होती. एखाद्या जादूगाराप्रमाणे त्यांनी पैसा कमावला होता. शेअर बाजारातल्या उलाढाली असोत, रेसच्या टिप्स असोत करोडपती लोक आजोबांचा सल्ला घेत. त्यांच्याभोवती गूढतेचे एक वलय निर्माण झाले होते. गरिबीतून वर आलेले त्यांचे मध्यमवर्गीय कुटुंबीय त्यांना दबकून असत. मुंबईतल्या सर्वोच्च श्रीमंत वर्तुळामध्ये त्यांची ऊठबस असायची. पण आजोबांचा मृत्यू अनाकलनीय होता. अल्पशा आजारानं त्यांचा गूढ मृत्यू झाला. तरीही नायक सॅफायर घेण्याच्या निर्णयावर ठाम राहतो.

सॅफायर आपल्याला लाभेल की नाही याची खातरजमा करण्यासाठी एक पद्धत आहे. कागदाच्या पुरचुंडीत किंवा रूमालात गुंडाळून खडा निजताना आपल्या उशाशी ठेवणे. याप्रमाणे खडा उशाशी ठेऊन निजलं की आपल्याला पडणाऱ्या स्वप्नांची नोंद टेवायची. स्वप्नं तपशिलवार आठवली पाहिजेत. स्वप्नात घडणाऱ्या गोष्टी शुभसूचक आहेत, लाभदायक आहेत, आपली इच्छापूर्ती करणाऱ्या आहेत अशी खात्री पटल्यानंतर मगच तो खडा वापरायला योग्य ठरतो. अशुभ, हानीची सूचना देणारी, अभद्र भीतीदायक, मन अस्वस्थ करून टाकणारी स्वप्न पडली तर समाजावं की हा खडा आपल्याला लाभणार नाही, तो खडा जवाहिऱ्याला परत करावा. खडा आणखीन आजमावून पाहण्यासाठी आणखी एक प्रकार म्हणजे तो पुरचुंडीत ठेऊन सतत आपल्या जवळ बाळगणे. विशिष्ट महत्त्वाच्या कामगिरीवर जाताना आपल्यापाशी खडा असला आणि जर आपण यशस्वी झालो तर हमखास समजावं की हा खड्याचाच प्रभाव आहे. अपयश आल्यास खडा परत करावा. एकदा खड्याचा गुण जाणवला की मग तो अंगठीत अशा रीतीने बसवून घ्यायचा की त्याचा आपल्या बोटाला स्पर्श झाला पाहिजे. असा हा गूढ खडा नायक आजमावून पहायचा ठरवितो. आर्थिक हालाखीच्या परिस्थितीत मित्रांकडून उसने पैसे घेऊन बायको माधवीचा विरोध पत्करून नायक हा खडा खरेदी करतो. आणि या खड्याची शुभसूचक चिन्हे नायकाला जाणवू लागतात.

संभाजीराव नावाच्या मित्राच्या आग्रहास्तव नायक घोड्यांच्या रेसवर सट्टा लावतो. आणि त्याला पावनेतीन हजार रूपयांचा सट्टा लागतो, ऑफिसमधील क्लॉडिया नावाची नायकाची सेक्रेटरी जिचे नायकाला शारीरिक आकर्षण होते ती नायकाच्या स्वाधीन होते, ऑफिसचे मॅनेजिंग डायरेक्टर जोझेफ सिल्व्हरस्टन यांनी नायकाला परदेशी नोकरीची ऑफर दिली मात्र मुलगा (टिंकूच्या) शिक्षणासाठी सूमित्राच्या सल्ल्यानुसार ही ऑफर नायक नाकारतो पण या नकारामुळे सिल्व्हरस्टन नाराज होत नाही तर स्वदेशीच नायकाला बढती मिळवून देतो. याशिवाय पगारवाढ, वरळीला फ्लॅट, गाडी, टेलिफोन इत्यादी सुखसोयी तो नायकाला पुरवतो. बलसारा नावाच्या एका मित्रासमवेत रेस खेळायला गेल्यावर त्याला पावणेचार लाखाच्या जॅकपॉट लागतो. इत्यादी साऱ्या शुभकारक घटना सॅफायरमुळे नायकाच्या जीवनात चालून येतात.

नायकाच्या या यशामुळे जसे त्याला आनंदी जीवन जगण्यास मिळाले होते तसे दुसऱ्या बाजूने त्याला दु:खाला सामोरे जावे लागले. या अद्‌भूत यशामुळे त्याच्या कौटुंबिक जीवनात दुरावा, तणाव निर्माण झाला. माधवी आणि टिंकू नायकाच्या या यशामुळे भयभीत झाले होते. ती दोघेही नायकाच्या या बदललेल्या जीवनामध्ये सामील होत नव्हते. टिंकू तर आपला रूसवासुद्धा नायकाला दाखवेनासा झाला. त्या दोघांचं जग नायकाच्या जगाहून वेगळे कौटुंबिक जग बनले होते. तर नायकाचं आयुष्य एखाद्या आत्मविश्वासानं भरपूर, तडफदार, वैभवसंपन्न अविवाहित तरूणासारखं मोकळं झालं होतं. माधवी आणि टिंकू प्रमाणेच नायकाचे सारे जुने मित्र आणि सहकारी अचानक एक सरहद्दीपलीकडे जातात. नायकाच्या या अकल्पित भाग्यामुळे त्यांना एक प्रकारचं भितीयुक्त आश्चर्य वाटत होतं. ही सारी माणसं नायकापासून दुरावल्यासारखी झाली होती. या दुराव्याची जाणिव नायकाला होते. भौतिक सुखापेक्षा कौटुंबिक नाती त्याचा जवळची वाटू लागल्यामुळे नायक तो खडा नष्ट करायचा ठरवतो.

एका मध्यरात्री उठून नायक ती अंगठी नष्ट करायला समुद्रावर जातो. खडा नष्ट करावा की नको यासारख्या विचारांनी नायकाची मनोवस्था गोंधळून जाते. याचवेळी एक तरूणी समुद्रावर आत्महत्या करायला आलेली असते. नायक तिला अडवतो व माझ्याशी

थोड्या गप्पा मारून तू जरूर आत्महत्या करायला जा असे सांगतो. नायक तिला सॅफायरची गोष्ट सांगतो हे ऐकता ऐकता ती बोलण्यात एवढी गुरफटून जाते की ती आत्महत्या करायची विसरूनच जाते. नायक तिला जीवनाची खरी जाणिव करून देतो. नायकाचे आभार मानून ती हसतमुखपणे घरी जाते. नायकही 'सॅफायर' समुद्रात फेकून नव्या जीवनाला सुरवात करतो. एका अर्थी त्या तरूणीचा व नायकाचा पुर्नजन्मच होतो.

एकूणच मानवी जीवनाची अतर्क्यता चित्रे या लघुकादंबरीत प्रकट करतात. एखाद्या प्राक्तन नियतीशरणतेचा, अनाकलनीयतेचा दाब मनुष्य जीवनावर असतो. माणसाच्या पराकोटीच्या ताणाची निर्मिती चित्रे इथे करतात. या ताणाच्या चित्रणासाठी घटना, प्रसंग, व्यक्तिरेखांची प्रभावी मांडणी चित्रे करतात. ही सबंध लघुकादंबरी अद्भूततेचा, गूढतेचा प्रत्यय देते. 'स्व' चा शोध व त्याची प्रचिती या लघुकादंबरीतून प्रकर्षाने जाणवते. अशाप्रकारे 'सॅफायर' भोवती फिरणाऱ्या, अद्भूत व गूढ अशा घटनाप्रसंगातून उलगडत जाणाऱ्या जादूमय यंत्रात्मकतेचे चित्रण दिलीप चित्रे यांनी प्रभावीपणे रेखाटले आहे.

## ४.३ 'स्व' चा अस्तित्वशोध - रुधिराक्ष :

दिलीप चित्रे यांच्या लेखनशैलीवर अस्तित्ववाद व अतिवास्तववाद या दोन विचारसरणीचा मोठा प्रभाव आहे. हा अस्तित्वशोध चित्रे निकराच्या आत्मभानाने घेतात. या आत्मभानावर कुठल्याही सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक-अनैतिक संकेतांचे दडपण येऊ न देता केवळ 'अस्तित्वाची' जाणीव ठेऊन मुक्तपणे चित्रे हा अस्तित्वशोध घेतात. त्यादृष्टीने चित्र्यांचे नाते एका बाजूने अतिवास्तववाद्यांशी तर दुसऱ्या बाजूने अस्तित्ववाद्यांशी आहे.

ही एक प्रयोगशील कादंबरी आहे. ९२ पृष्ठांची लघुकादंबरी ९७ प्रकरणांमध्ये विभागलेली आहे. रुधिराक्षची अस्तित्वशोधासाठी चाललेली धडपड चित्रेंनी या लघुकादंबरीतून चित्रित केली आहे. माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे. माणसाचं रूप समाजानं निर्माण केलेलं असतं. माणसातला एक भाग जो सामाजिक आहे तो समाजाच्या दृष्टीने नॉर्मल आहे. पण माणसातला एक भाग जो निसर्गानं उत्पन्न केला आणि ज्याच्यावर समाजाचं नियंत्रण नाही तो असामाजिक आहे. या असामाजिक माणसाचा बळी दिल्याशिवाय माणूस नॉर्मल ठरत

नाही. रुधिराक्ष हा असाच असामाजिक माणूस ठरवला गेला आहे. त्याला आपल्या अस्तित्वाची जाणिव होत नाही तोपर्यंत तो समाजाच्या दृष्टीने असामाजिकच ठरवला जाण्याची शक्यता आहे. रुधिराक्षला आपल्या अस्तित्वाची जाणिव होणे हा या लघुकादबंरीचा मूळ गाभा आहे.

रुधिराक्ष हा एक स्किझ्झोफ्रेनिक आहे. त्याचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे. सर्वसामान्य माणसासारखा तो 'नॉर्मल' नाही. त्याच्या मेंदूमध्ये ट्यूमर झालेले आहे, त्याचं दर पंधरा दिवसांनी ऑपरेशन करावं लागतं. विस्मरणाचे झटके त्याला वारंवार येतात. टेंपररी ब्लाइंडनेसमूळे काही वेळा त्याची स्मृती भ्रंश होते. रुधिराक्षचे डोळे लाल आहेत. लोकांना त्याच्या लाल डोळ्यांची भीती वाटते, रुधिराक्ष हा तसा निरूपद्रवी आहे. तो कोणालाही त्रास देत नाही. रुधिराक्ष ड्रेनेज उपसण्याचे काम करतो. त्याच्या मते ते जगातील सर्वात वैश्विक काम आहे. त्याची एक प्रेयसीसुद्धा आहे. तिचे लग्न झालेले आहे, तरीसुद्धा रुधिराक्ष तिच्यावर खूप प्रेम करतो. ड्रेनपाईपवरून चढून आपल्या प्रेयसीचा तिच्या नवऱ्याबरोवर चाललेला संभोग पाहणे हा रुधिराक्षचा नित्यक्रम आहे. प्रेयसीला रुधिराक्ष आवडतो; पण त्याने चांगल्या प्रतिष्ठेच्या नोकऱ्या सोडून ड्रेनेज उपसण्याचे काम करणे तिला पसंत नसते. तिला सुसज्ज घर, नोकर-चाकर, गाडी इत्यादी सुखसोयी रुधिराक्ष कडून हव्या होत्या मात्र रुधिराक्षला काही वेगळेच हवे होते. त्याची प्रेयसी तिच्या नवऱ्याबरोबर सुखी नव्हती. संभोगाच्यावेळीही ती रुधिराक्षला निर्जिव भासत असे. समागमाचा आनंद रुधिराक्षने तिच्या चेहऱ्यावर कधी पाहिलाच नसतो. त्यामुळे रुधिराक्ष बैचेन असतो. तो म्हणतो, "तुला अशी बधिर, संवेदनाहीन, थंडगार, प्रेतवत स्वरूपात समागम करताना पाहून माझ्या अंगावर शहारे येतात. ज्या रात्री मला तुझा मैथुनमग्न चेहरा सुखानं चिंब झालेला दिसेल, जेव्हा तुला अगदी आतून परमसुखाचे असह्य डोलावे येत राहतील आणि अनावर होतील, जेव्हा तुझं अंगांग उचंबळून येईल आणि तू आनंदान कण्हू लागशील त्या रात्री मी माणसात परत येईन. त्या रात्री मी पुन्हा मानवतेच्या विश्वात परतलेलो असेन."[४०] अशा प्रकारची त्याची इच्छा, मनोवृत्ती असते. उत्कटता ही अस्तित्वाची अंतिम कसोटी आहे असे चित्रे मानतात त्याप्रमाणे

माणसाच्या सर्व प्रकारच्या भावना, वासना, ईच्छा-आकांक्षा या स्वैरपणे परिपूर्ण करण्याकडे माणसाचा कल असला पाहिजे अशा मनोवृत्तीची रूधिराक्ष ही व्यक्तिरेखा आहे.

द सिलेश्‍चियल ड्रेनपाईप कंपनीच्या महत्त्वाच्या पदावर रुधिराक्षल बढती मिळते. रुधिराक्ष प्रसिद्धीच्या झोतात येतो. पण रुधिराक्षच्या विचित्र वागण्यामुळे या कंपनीच्या मुख्य डायरेक्टरांनाही त्याची काळजी वाटू लागते. पण रुधिराक्षच्या अशा वागण्याच्या उलगडा करण्यात ते अयशस्वी ठरतात. रुधिराक्षला पैसा, प्रसिद्धी असे काहीच नको होते. त्याला फक्त खड्डा खणायचा होता आणि ड्रेनपाइपनं स्वर्गाला जाता येतं हे सिद्ध करायचं होतं. सांडपाण्यातून मानवी अस्तित्वाचा शोध घेण्याचा रुधिराक्षचा प्रयत्न हा एक विलक्षण अनुभव म्हणावा लागेल. रुधिराक्षच्या पत्नीलाही सांडपाण्याचा किळस येतो. पण रुधिराक्ष तिला सांगतो, "जिला तू घाण म्हणतेस तिच्यावर जीवनचक्र चालतं. ती वनस्पतींना, सुक्ष्म जंतूंना, किड्यांना, जलचरांना, पक्ष्यांना, प्राण्यांना, पिकांना पोसते. घाणीतही सत्त्व असते. पोषक द्रव्यं असतात. परोस्परोपजीवी जीवसृष्टीत काहीच घाण नाही, काहीच अंतिम टाकाऊ नाही, काहीच निरूपयोगी नाही."[४१] अशाप्रकारे रुधिराक्षची अनुभव घेण्याची ही स्वतंत्र मनोवृत्ती आहे. असा प्रगल्भ विचार करताना तो सामाजिक संकेतांचे दडपण बाजूला सारून तो या साऱ्या जीवनानुभवाकडे एक तटस्थ वृत्तीने पाहतो. या जगामध्ये शुद्ध जर काय असेल तर ते शून्य आहे. पण प्रत्यक्षात मात्र शून्य अस्तित्वातच नाही. अशा प्रकारची रुधिराक्षची मनोवृत्ती आहे. अखिल मानव जातीच्या शुद्ध-अशुद्धतेच्या, पवित्र-अपवित्रतेच्या संकल्पनांना छेद देऊन वैश्विक सत्याची मांडणी इथे रुधिराक्ष करतो. त्याचप्रमाणे मानवाच्या आदिम कामप्रेरणेचे आधुनिक काळामध्ये बदललेल्या स्वरूपाचा समाचारही तो घेतो. मानवी मनाच्या अबोधावस्थेतील विश्‍व, अज्ञात लैगिंक प्रेरणा व अभाविक शारीरिक प्रेरणा चित्रे यांनी रुधिराक्षच्या रूपाने प्रकट केल्या आहेत. आदिम नैसर्गिक भाव रुधिराक्षला आवडतात. त्याच्या कल या निसर्गदत्त अनुभवाकडे जास्त दिसून येतो. वसंत आबाजी डहाके म्हणतात त्याप्रमाणे, "आदिम कमप्रेरणेचे झालेले व्यावसायिक कृतीमध्ये रूपांतर क्रय-विक्रयाच्या प्रक्रियासारखे झाले आहे हे ह्या कांदबरीतील तुकड्यांवरून (प्रकरणांवरून) प्रकट होते."[४२] हे

विधान योग्य वाटते. असामान्य वर्तन करणाऱ्या रुधिराक्षला समाज असामाजिक ठरवितो. पण स्वत: सांडपाण्याचा कवी आणि तत्त्वज्ञ, भक्त आणि चिंतक समजणारा रूधिराक्ष डायनॉसोर्सच्या आदिम जगातून व्यवहारी जगात येऊ इच्छितो. आणि त्याला झालेली 'स्व' च्या अस्तित्वाची जाणिव होय.

अशाप्रकारे दिलीप चित्रे यांनी रुधिराक्षच्या रूपाने संबंध मानव जातीच्या आदिम प्रेरणेचे यांत्रिकीकरण कसे होत चालले आहे याचा वेध या लघुकादंबरीद्वारे घेतला आहे. सामाजिक संकेतांचे दडपण बाजूला सारून पाहणारा नायक चित्रे यांनी रुधिराक्षच्या रूपात प्रकट केला आहे.

## ४.४ 'स्त्री' च्या अंतर्मनाचा वेध - 'द फुल मून इन विंटर':

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यात 'स्त्री' ला खूप महत्त्वाचे स्थान आहे. स्त्री मनाच्या, देहाच्या विविध छटा चित्रेंनी आपल्या कथात्म साहित्यातून रेखाटल्या आहेत. त्याचप्रमाणे दिलीप चित्रे लैगिंक अनुभवातून मानवी अस्तित्वाचा शोध घेतात, त्यामुळे त्याच्या कथात्म साहित्यात स्त्री-पुरुष संबंधाला महत्त्वाचे स्थान आहे. स्त्री चे पुरुषाबरोबर असणाऱ्या विविध पातळीवरच्या संबंधाचे चित्रण चित्रे तटस्थ वृत्तीने करतात. चित्रे स्त्री ला जगातील आनंदमय अशी अपारंपार गोष्ट मानतात. त्याचप्रमाणे प्रत्येक स्त्री-पुरुष हा प्रत्यक्ष शिव आणि शक्तीचा संबंध आहे असे ते मानतात. चित्रे यांच्या साहित्यात स्त्री देहाविषयी अवयववाचक अशी टोकाची वर्णने पहावयास मिळतात. चित्रे स्त्री कडे पारंपरिक दृष्टीने न पाहता एका नव्या दृष्टीने पाहतात व त्या दृष्टीचे चित्रण आपल्या साहित्यकृतीतून करतात.

'द फुल मून इन विंटर' या लघुकादंबरीतून चित्रे यांनी ललिता होनावर नावाच्या एका अविवाहित मध्यमवयीन स्त्रीच्या एकाकीपणाचा वेध घेतला आहे. ललिता होनावरच्या थंड स्वभावामुळे तिला महाविद्यालयीन काळात 'द फुल मून इन विंटर' असा फिशपॉंड नायक व त्याच्या मित्रमंडळाकडून मिळाला. हा फिशपॉंड मिळण्यामागे तशी कारणेही होती. ललिता होनावर दिसायला सुंदर होती, उच्चवर्गीय राहणीमान होते, पण तिच्या चेहऱ्यावर एक कडक इस्त्रीचा अर्विभाव असायचा. बाकीचं जग तुच्छ आहे किंवा

अस्तित्वातच नाही असे तिचं वागणं असायचं. ती कोणाशीही हसून-खेळून बोलायची नाही. अंतर ठेऊनच वावरायची थोडक्यात दिसायला रूपवती म्हणून द फुल मून पण थंड स्वभावाच्या, दूर राहणाऱ्या आणि कळायला कठीण होती म्हणून इन विंटर असा शिक्कामोर्तब नायक व नायकाच्या मित्रमंडळाने तिच्यावर केला होता. पुढे वयाच्या पन्नाशीनंतर नायकाचे मित्रमंडळ अजून टिकून आहे याचे तिला आश्चर्य वाटते. नायकाच्या मित्रमंडळाला एकदा भेट द्यायची असे ती ठरवते. या भेटीची नायक सर्व तयारी करतो. जुन्या रेकॉर्डस् ऐकत, मद्यपान करत यांची बैठक जमते. होनावर कॉलेजजीवनात तिला ठेवलेल्या 'द फुल मून इन विंटर' या फिशपॉंडबाबत नायकाला व त्यांच्या मित्रांना जाब विचारते. या विषयावर त्यांच्यामध्ये वरीच चर्चा, वाद होतात. शेवटी दारूच्या नशेत सर्वजण झोपी जातात. ललिता होनावरची बहिण गिता होनावर नायकाला फोन करून ललिताचं मानसिक संतुलन बिघडलं आहे, तिला मानसोपचाराची गरज आहे, गेल्या आठवड्यात तिने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. तिला पुरूषाच्या सहवासाचं ऑबसेशन आहे, अचानक तिचे मूड पालटतात. अशी सूचना करते. नंतर ललिता होनावर व नायकाचा संभोग घडून येतो. मध्यरात्री सर्वजण झोपले असताना ललिता होनावर गॅलरीतून उडी टाकून आत्महत्या करते आणि लघुकादंबरी संपते.

चित्रे यांच्या या लघुकादंबरीला मनोविश्लेषणाचे एक मोठे परिमाण आहे. महाविद्यालयीन काळात नायकाच्या मित्रमंडळाने ललिता होनावरवर थंडपणाचं लेबल जाहीरपणे चिकटवून टाकले त्यामुळे सर्वजण तिच्याकडे संवेदनाशून्य, भावनाशून्य, दांभिक, गर्विष्ठ, माणूसघाणी म्हणून पहायला लागले. या घटनेचा तिच्या मनावर खोलवर आघात झाला. त्याचा उलघडा चित्रे या लघुकादंबरीद्वारे करतात. विशिष्ट सामाजिक धोरणांमुळे व्यक्तिमनावरील दाब वाढत जातो. त्यामूळे अशा व्यक्ती आपल्या सहजसिद्ध स्वातंत्र्याचा संकोच करतात, त्यांचे सहजपणाचे संतुलन बिघडते व अशा व्यक्ती एका समाजनियमाच्या चौकटीत स्वत:ला कोंडून घेतात अशा मानसचित्रणाचा एक पैलू चित्रे ललिता होनावर या व्यक्तिरेखेद्वारे उघड करतात. त्याचप्रमाणे मानवी जीवनातील निसर्गदत्त भावना, वासना, इच्छा-आकांक्षा दडपल्या गेल्यामुळे किती भयाण वास्तवाला त्याला सामोरे जावे लागते याचे

चित्रण दिलीप चित्रे यांनी ललिता होनावर या व्यक्तिरेखेद्वारे घेतला आहे.

## ४.५ एब्राहामच्या अस्तित्वाचा शोध - 'एब्राहामची वही' :

दिलीप चित्रे यांची प्रयोगशिलता त्यांच्या प्रगल्भ वैचारिक जाणिवेची साक्ष पटवून देते. आशय, विषयाप्रमाणेच भाषेमध्ये जाणवणारी त्याची प्रयोगशिलता आधुनिकतेचा प्रत्यय देते. 'एब्राहामची वही' या लघुकादंबरीत दिलीप चित्रे यांनी एब्राहाम या व्यक्तिरेखेच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. तृतीयपुरुषी निवेदन पद्धतीतून उलगडत जाणारा एब्राहामचा संवेदनास्वभाव एब्राहामच्या वहीमुळे नायकाची बदललेली मनोवस्था यांचे चित्रण चित्रेंनी वैयक्तिक अनुभवाच्या पातळीवरून या लघुकादंबरीतून शब्दशब्द केले आहे. एक प्रकारच्या फॅन्टसीचा अनुभव ही लघुकादंबरी वाचून येतो.

एब्राहाम बेंजामिन हा नायकाचा मित्र होता. तो मराठी भाषी ज्यू म्हणजे बेने इस्त्राएली होता. नायक त्याला बेंजी म्हणत असते. बेंजी अतिशय बुद्धिमान व प्रतिभाशाली होता. वाङ्मय, चित्रपट, संगीत, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इतिहास अशा विविध विषयात त्याला गती होती. तो प्रशिक्षित नाट्यदिग्दर्शक आणि नट होता. शेक्सपियरीन नाटकापासून अतिनव नाट्यापर्यंत नाटकं त्यानं हाताळलेली होती. नायकाच्या शिफारशीमुळं त्याला एका जाहिरात कंपनीत अकाऊंटस् एक्झिक्युटिव्ह म्हणून काम मिळाले होते. एब्राहमला पॅरानॉइड स्किझोफ्रेनिया या मानसिक विकाराने ग्रासले होते. एके दिवशी एब्राहामने नायकाकडे सहाशे पानी रजत छापाची वही वाचायला आणि ठेवायला दिली. ह्या वहीत मानसशास्त्र आणि नीतिशास्त्र या विषयावरले एब्राहामचे अभिप्राय, समीक्षा, विचार होते. त्यानंतर एब्राहामचा मृत्यू झाला. एब्राहामच्या मृत्यूनंतर नायकाला खूपच अस्वस्थता जाणवायला लागते. सभोवतालच्या सर्वच माणसांमध्ये नायकाला वेडाची लक्षणे जाणवायला लागतात. रात्री-अपरात्री एब्राहामने दिलेली सहाशे पानी वही तो वाचत सुटतो. त्यातील फुटकळ परिच्छेद आणि टिपणं पाहता-पाहता त्याला कित्येकदा झपाटल्यासारखं होत होतं. ही वही वाचून नायक भराभर गद्य लिहीत सुटतो. अशी अवस्था का होत आहे याचे कारण नायकाला हळूहळू कळते. ते म्हणजे एब्राहामला वाटत होते की त्याच्या 'लाईफ ॲण्ड डेथ' या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

नियतकालिकासाठी नायकाने एक दीर्घकथा लिहावी आणि त्या कथेत त्याने स्वत:च्या हकीकत आणि कैफियती बेमालूमपणे पुरून ठेवाव्यात. एब्राहामच्या मृत्यूनंतर आपण त्याच्या जाळ्यात अडकून पडू असे नायकाला कधी वाटले नव्हते. पण नेमकं तेच घडलं. नायक एब्राहामच्या मृत्यूनंतरही तो नायकाचा पिच्छा सोडत नाही. नायकाच्या बुद्धीचा ताबा जणू तो घेतो. हे सर्व वाचत असताना वाचकांना फॅन्टसीचे अनोखे दर्शन होते. एब्राहामने नायकाच्या बुद्धीचा ताबा घ्यावा त्याअर्थी नायकाच्या तसेच एब्राहामच्या मनातील अमूर्त विचारांना मूर्त स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न इथे प्रत्ययास येतो.

एब्राहामच्या वहीतल्या विचारांचाच प्रभाव म्हणून की काय, नायक पंचवीस वर्षापूर्वी जिथे राहत होता त्या कॅडेल रोड, माहीम. बाबा मगदूम दर्गा' या परिसरामध्ये अजाणतेपणी जातो. हे नायकाच्या बाबतीत सारे अकल्पित घडत असते. या साऱ्याचे चित्रण करीत असताना चित्रेंनी फॅन्टसीचा वापर केला आहे. मुंबईच्या या जुन्या परिसरात नायकाला अब्दुल कादिर नावाचा जुना मित्र भेटतो. अब्दुल कादिर नायकाचा सर्व सुखसोयींनी पाहुणचार करतो. या सर्व पाहुणचाराने नायक गोंधळतो. अनिसा नावाच्या दासीसोबत आलेला अनुभव तर वेगळ्यात पातळीवरचा आहे. एब्राहामचा प्रभाव नायकावर असल्यामुळे नायक स्वत:च्या बुद्धीने काहीच करू शकत नाही. अदृश्य स्वरूपात एब्राहाम नायकाशी संवाद साधत असतो आणि भूतकाळात दडपलेल्या नायकाच्या इच्छा-आकांक्षांना तो उजाळा देत राहतो. उदाहरणार्थ, परफॉरमिंग आर्टमध्ये चित्रपट बनविण्याची नायकाची इच्छा असते. ती इच्छा नायक व अनिसाच्या स्वप्नसदृश्य दृश्यातून नायकाच्या अमूर्त इच्छांना पूर्णत्व देण्याचा प्रयत्न चित्रेंनी केलेला दिसतो. त्याचप्रमाणे 'द पेंटॅग्रॅम' ही नायकाची अपूरी कादंबरी आहे. त्या कादंबरीचा नायक याकोब स्टायनर हा सुद्धा एका एका स्वप्नसदृश्य दृश्यात नायकाशी संवाद साधताना दिसून येतो. एका दृष्टीने भास-आभास, वास्तव-अतिवास्तव पातळीवरून नायकाच्या अतृप्त इच्छांचा तसेच एब्राहामच्या अस्तित्वाचा शोध चित्रे अतिवास्तवाच्या पातळीवरून या लघुकादंबरीतून घेतात. एकूणच आधुनिक काळात मानवी जीवनाच्या विस्कटून गेलेल्या अंतर्रचनेचा शोध चित्रेंनी या लघुकादंबरीतून घेतला आहे.

अशाप्रकारे 'चतुरंग' या लघुकादंबरीसंग्रहातील आशयसूत्रे ही चित्रे यांच्या प्रगल्भ तसेच विलक्षण अनुभवविश्वांनी गजबजलेली आहेत. मानवी अस्तित्वाला इथे खूप महत्त्व आहे. मानवी जीवनातील विविध अनुभव चित्रे अतिवास्तवाच्या पातळीवरून मांडतात. मानवी अस्तित्वाभोवती फिरणाऱ्या चित्रे यांच्या उपरोक्त चारही लघुकादंबऱ्या त्यांच्या आधुनिक प्रयोगशिलतेचा प्रत्यय देतात.

## सारांश :

प्रस्तुत प्रकरणात दिलीप पुरूषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याची आशयसूत्रे आपण विस्ताराने अभ्यासली. या अभ्यासातून असे आढळते की 'अस्तित्वशोध' हे त्यांच्या कथात्म साहित्याचे मुख्य आशयसूत्र आहे. मानवी अस्तित्वाचा शोध ते प्रभावीपणे घेताना दिसतात. अस्तित्ववादाप्रमाणे अतिवास्तववादी विचारसरणीचा मोठा प्रभाव त्यांच्या कथात्म लेखनावर आहे. जीवनातील सुसंगत गोष्टीपलीकडे ज्या काही विसंगत, अनाकलनीय गोष्टी आहेत त्यांचा वेध चित्रे अतिवास्तवाच्या पातळीवरून घेतात. महानगरीय जीवन चित्रे यांच्या कथात्म साहित्याचा अविभाज्य घटक आहे. १९६० नंतरच्या कालखंडातील चित्रे हे एक महत्त्वाचे कथात्म लेखक आहेत. महानगरीय जीवनाची पार्श्वभूमी त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीला आहे. या प्रचंड महानगरीय जीवनात एकाकीपणे वावरणाऱ्या व्यक्तिरेखांचा परामर्श ते घेतात. स्त्री-पुरुष संबंध हे ही दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे महत्त्वाचे आशयसूत्र आहे. पण संबंधाची मांडणी चित्रे अध्यात्मिक स्तरावरून करतात. स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण, स्त्री देहाची सखोल वर्णने ही सर्व चित्रे यांच्या अध्यात्मिक जाणिवेची द्योतक आहे. स्त्री ला ते मानवाची आदिम प्रेरणा मानतात. एकूणच मानवाबद्दल आस्था असणारे चित्रे हे एक कथात्म लेखक आहेत. आधुनिक प्रयोगशीलतेचा प्रत्यय त्यांच्या कथात्म साहित्याच्या आशयसूत्रावरून येतो.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'तिरकस आणि चौकस', 'एका शाळकरी कवीचं ऋण' लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९0, पृ. १२१

२) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'चाव्या' 'परस्त्री, परदेश आणि पुन:प्रत्यय', प्रास प्रकाशन, मुंबई , पहिली खेप, कार्तिकी १९0४, पृ.३७.

३) 'Webster's Third New International Dictionary', Vol-1., १९७0, पृ.७९६.

४) 'The New Oxford I llustrated Dictionary' Vol- 1, १९६१ पृ.५८३.

५) वाळिंबे रा.शं - 'एग्झिस्टेशलिझम' सत्ता द्वैतवाद साहित्यातील संप्रदाय, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे तिसरी आवृत्ती १९७४, पृ -४0५.

६) पाटील विश्वास - 'अस्तित्ववाद' नवी क्षितीचे लेखांक - १, अंक-१, संपा. विश्वास पाटील / नाना जोशी जूलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९७२, पृष्ठ.८

७) रेगे. मे.पु. - 'अस्तित्ववाद', मराठी विश्वकोश खंड पहिला, १९७६ पृ.६६३

८) फडके भालचंद्र - 'दिलीप चित्रे यांचे कथालेखन', प्रतिष्ठान सप्टें १९७0 पृ.२५.

९) चित्रे दिलीप पुरूषोत्तम - 'स्वत:च्या लेखनासंबंधीचे विचार' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.१४६.

१०) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'ऑर्फियस', ऑर्फियस साकेत प्रकाशन, १९६८, पृ.३.

११) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'मेथिड्रिन' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.२१.

१२) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'व्हायरस' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.२९-३०.

१३) तत्रैव - पृष्ठ - ३२.

१४) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'स्वत:च्या लेखनासंबंधीचे विचार' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.१९३४.

१५) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'केसाळ काळंभोर पिल्लू' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.३६.

१६) फडके भालचंद्र - 'दिलीप चित्रे यांचे कथालेखन', प्रतिष्ठान सप्टे १९७०, पृ.२६.

१७) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'स्वत:च्या लेखनासंबंधीचे विचार' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.१४८.

१८) बांदिवडेकर चंद्रकात - मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप संपा. गो.मा.पोवार, म.द.हातकणंगलेकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६ पृ. १६८.

१९) तत्रैव - पृष्ठ - १६९.

२०) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - शतकांचा संधिकाल 'हिंसा आणि लोकसंख्या' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९५ पृ.१६६.

२१) तत्रैव - पृष्ठ - ७२.

२२) हातकणंगलेकर म.द. - प्रदक्षिणा-खंड दुसरा 'स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कथा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९१, पृ.१५१.

२३) शेवडे इंदुमती - मराठी कथा : उद्गम आणि विकास, सोमय्या पब्लिकेशन, १९७३, पृ.३७६.

२४) फडके भालचंद्र - दिलीप चित्रे यांचे कथालेखन प्रतिष्ठान सप्टे, १९७0, पृ.२९.

२५) बेडेकर सुधीर - ऑर्फियस : सर्वनाशाचे एक अमानुष वर्तुळ सत्यकथा, एप्रिल १९७0, पृ.५५.

२६) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - दहा हजार शब्द, ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.६.

२७) हातगणंगलेकर म.द. - प्रदक्षिणा-खंड दुसरा, 'स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कथा कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९१.

२८) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'जाराच स्वगत' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.१0१.

२९) बांदिवडेकर चंद्रकात - मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप संपा. गो.मा.पोवार, म.द.हातकणंगलेकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६ पृ. १६८.

३0) बेडेकर दि.के. - 'साहित्यातील बीभत्स गारठा' सत्यकथा मार्च १९६७, पृ.१३.

३१) बांदिवडेकर चंद्रकात - मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप संपा. गो.मा.पोवार, म.द.हातकणंगलेकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६ पृ. १६७.

३२) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - 'प्रतिभावंताचं मरण' ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.१२३, २४.

३३) चित्रे दिलीप पुरुषोत्तम - प्रास्ताविक नोंद, चतुरंग पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९५.

| | | | |
|---|---|---|---|
| ३४) | चित्रे दिलीप पुरुषोत्तम | - | तत्रैव |
| ३५) | माहुलकर दि. द. | - | मराठी वाङ्मयकोश - खंड चौथा समीक्षा संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ, मुंबई-२००२. समन्वयक संपादक-विजया राजाध्यक्ष, पृ.४,५. |
| ३६) | जाधव रा.ग. | - | मराठी विश्वकोश खंड-१ अतिवास्तववाद, १९७६ पृ.१८४. |
| ३७) | पाध्ये दिगंबर | - | मराठी वाङ्मयकोश - खंड चौथा समीक्षा संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ, मुंबई-२००२. समन्वयक संपादक-विजया राजाध्यक्ष, पृ.५. |
| ३८) | चित्रे दिलीप पुरुषोत्तम | - | सॅफायर, चतुरंग पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९५, पृ.१७,१८. |
| ३९) | चित्रे दिलीप पुरुषोत्तम | - | तत्रैव, |
| ४०) | चित्रे दिलीप पुरुषोत्तम | - | रुधिराक्ष, चतुरंग पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९५, पृ.७९. |
| ४१) | चित्रे दिलीप पुरुषोत्तम | - | तत्रैव |
| ४२) | डहाके वसंत आबाजी | - | मराठी प्रयोगशील कादंबरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मराठी विभागांतर्गत उद्‌बोधन वर्गात झालेल्या व्याख्यानावरून उधृत २००५. |